


गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १०६ * नांदेड * बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मी संघर्ष योद्ध्याची सहचारिणी, येसूबाई जशा लढल्या तशी लढेन

## बारामतीच्या मैदानातून सुनेत्रा पवारांचा विश्वास

**पुणे (प्रतिनिधी)–** दादा जरी गेले असले तरी त्यांची स्वप्ने अजूनही जिवंत आहेत, तीच स्वप्न पूर्ण करण्याचं काम मी करेन, बारामतीकरांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. मी संघर्षयोद्ध्याची सहचारिणी आहे. येसूबाई जशा लढल्या तशी लढेन, अहिल्यादेवींनी जसा कारभार केला तसा कारभार करेन. सर्वांना न्याय देण्याचं काम करेन असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला.



बारामती पोटनिवडणुकीची सांगता सभा मंगळवारी पार पडली. यावेळी अजित पवारांच्या आठवणीत सुनेत्रा पवार भावूक झाल्याचं दिसून आलं. या सांगता सभेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादीचे प्रमुख नेते आणि खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

आपल्या भाषणात सुनेत्रा पवार म्हणाल्या की, दादा जरी गेले तरी त्यांची स्वप्न अजूनही जिवंत आहेत. दादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. मात्र त्यांच्या विचाराचा वारसा मी पुढे घेऊन जाणार आहे. बारामतीकर जनता माझ्या पाठीशी आहे, तोपर्यंत मी खचणार नाही. मागे हटणार नाही. मी एका संघर्षयोद्ध्याची सहचारिणी आहे. येसुबाई जशा लढल्या, तसेच मी लढेन. अहिल्यादेवींनी जसा कारभार केला, तसाच कारभार करेन.

दादांचं स्वप्न आणि त्यांच्या कर्तव्याची जाणीव, त्यांच्या पश्चात माझ्यावर आलेल्या जबाबदारीची जाणीव आहे. त्याचा शिवधनुष्य मी उचलून तुमच्यासमोर आले आहे. दादांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाईन, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या.

### शरद पवारांचं रुग्णालयातून भावनिक आवाहन

आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. स्व. अजित पवार यांना ही एकप्रकारे आमच्या पक्षातर्फे श्रद्धांजलीच आहे. माझे बारामतीमधील सर्व मतदारांना आवाहन आहे की, त्यांनी सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी. बारामतीमधील मतदार यांनी माझ्यावर प्रदीर्घ विश्वास ठेवलेला आहे. ते या आवाहनास प्रतिसाद देतील, असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.

# चर्चा नाही तर मोठा धमाका करू! डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला निर्वाणीचा इशारा

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)–** अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न आता निर्णायक वळणावर आले आहेत. येत्या बुधवारी दोन आठवड्यांचा संघर्षविराम संपत असून, तो पुढे वाढवण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. जर शांतता करार झाला नाही, तर आम्ही मोठे धमाके करू, असा इशारा ड्रोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

पाकिस्तानमध्ये होणाऱ्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीत सहभागी होण्यास इराणने नकार दिल्याचे वृत्त आहे. इराणच्या मते, अमेरिका नाकेबंदी करून आणि अवास्तव अटी लादून चर्चेच्या टेबलाला 'शरणागती'च्या टेबलात बदलण्याचा प्रयत्न करत आहे. होर्मुझची सामुद्रधुनी हा सध्या दोन्ही देशांमधील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. या परिसरात दोन्ही देश लष्करी हालचाली वाढवत असून तणाव कमी होण्याऐवजी वाढतच चालला आहे.

ट्रम्प प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, त्यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी पाकिस्तानला जाणार आहेत. मात्र, ट्रम्प यांच्या सार्वजनिक विधानांचा सूर आणि सुरू असलेली आर्थिक व नौसैनिक नाकेबंदी यामुळे चर्चा यशस्वी होण्याबद्दल साशंकता व्यक्त केली जात आहे.

इराणी अधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले की, अमेरिकेची ही 'धमकावण्याची नीती' चर्चेसाठी सर्वात मोठा धोका आहे. संघर्षविराम संपण्यासाठी आता काही तास उरले असून, जग आता ट्रम्प आणि खामेनेई यांच्या पुढील पावलांकडे लक्ष लावून आहे.

# अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम उपाययोजना करणार –देवेंद्र फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः अल्प भूधारक शेतकऱ्यांना बसत आहे अतिउष्णतेच्या संकटावर उपाययोजना करण्यासाठी तसेच 'उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर फॉर एक्सलेन्स'चा शुभारंभ करण्यात आला असून हे केंद्र भविष्यात राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे आयआयएम, नागपूर येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हिट रेसिलियन्स अँड सस्टेनेबल कुलिंग'चे उद्घाटन केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलचे अध्यक्ष मनीष बापना, एनआरडीसी इंडियाच्या कंट्री डायरेक्टर दीपा सिंग बगई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉक्टर भालचंद्र चव्हाण, नागपूर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक डॉ. भिमराया मैत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विदर्भासह राज्याच्या अनेक भागांत अलीकडे उष्णतेच्या लाटेमुळे शाळा–महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ आली होती. हवामान बदल या संकटाचा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला, विशेषतः छोट्या शेतकऱ्यांना बसत आहे. दुष्काळ, गारपीट आणि वाढते तापमान यामुळे समस्याही गंभीर होत आहेत, यावर तोडगा काढण्यासाठी सेंटर फॉर एक्सलन्स उपयुक्त ठरणार आहे. या संस्थेमार्फत सुरुवातीला प्राधान्याने उष्णलाट कृती आराखडा आणि शहरी हवामान कृती आराखड्यांचा आढावा घेऊन प्राधान्य दिलेल्या शहरांना आणि जिल्ह्यांना तांत्रिक अंमलबजावणीसाठी सहाय्य केले जाईल. उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणे, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणे. त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येणार आहे.

# भाजपाचे ७४ जिल्हा प्रभारी जाहीर

## नांदेड महानगरची धुरा निलंगेकरांवर, उत्तर पाटील तर दक्षिण कुलकर्णींकडे

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी काळातील राजकीय व संघटनात्मक कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पक्षाने मोठे राज्यव्यापी पाऊल उचलत ७४ जिल्हा प्रभारींची नियुक्ती केली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली असून, या नियुक्त्यांमुळे संघटनात्मक कार्याला अधिक गती मिळणार असल्याचे मानले जात आहे.

भाजपच्या बदलांमध्ये नांदेडचाही समावेश आहे. महानगर प्रभारीपदी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची नियुक्ती करण्यात आली असून नांदेड उत्तरची जबाबदारी किरण पाटील,तर नांदेड दक्षिणची धुरा रेखा कुलकर्णी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या तिन्ही नियुक्त्यांमुळे नांदेडमधील भाजप संघटन अधिक मजबूत आणि गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्यभर संघटनात्मक बळकटीसाठी ही मोहीम राबवण्यात आली असून प्रत्येक जिल्हा प्रभारी आपल्या अनुभव, संघटन कौशल्य आणि नेतृत्वाच्या बळावर स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेत पक्षाची पकड अधिक भक्कम करतील, असा विश्वास रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. आगामी निवडणुका आणि विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर या नियुक्त्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले आहेत. परभणी शहरासाठी प्रवीण घुगे तर ग्रामीण भागासाठी आ. संजय केनेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय कौडगे यांच्याकडे हिंगोलीची जबाबदारी देण्यात आली आहे. जालना महानगरासाठी खासदार अजित गोपछडे तर ग्रामीण भागासाठी खासदार रामराव वडकुते यांची निवड करण्यात आली आहे. लातूर शहरासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड तर ग्रामीण भागासाठी मनोज पांगारकर यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यासाठी अर्चना पाटील चाकूरकर यांची नियुक्ती झाली असून बीडसाठी सुनील राणे यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये शहरासाठी चैतन्यबापू देशमुख, उत्तर भागासाठी राहुल लोणीकर आणि पश्चिमेसाठी माजी खासदार प्रीतम मुंडे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# लातूर पॅटर्नचे जनक, माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांचे निधन

**लातूर (प्रतिनिधी)–** राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात लातूर पॅटर्न चांगलाच गाजला, या पॅटर्नमागे अनेकांचं डोकं आणि कार्य राहिलेलं आहे. याच लातूर पॅटर्नला राज्यभरात ओळख मिळवून देणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी खासदार आणि शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांचे मंगळवारी सकाळी निधन झाले, ते ९४ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने केवळ लातूरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. तर, दिग्गजांनी त्यांच्या आठवणी जागवत श्रद्धांजली अर्पण केली.



माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. शिक्षण, वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अतिशय मोठे होते. वैद्यकीय सेवांमुळे त्यांना लोक 'देवमाणूस' म्हणायचे. त्यांच्या शिक्षण संस्थेमुळे लातूरला राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक ओळख प्राप्त झाली. मलाही या शिक्षण संस्थेत कार्यक्रमाच्या निमित्ताने जाण्याची संधी मिळाली. मराठवाड्यातील अनेक होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी डॉक्टर, अभियंते म्हणून घडवले, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

डॉ. पाटील हे शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली लातूरमध्ये शिक्षणाची भक्कम पायाभरणी झाली आणि त्यातूनच पुढे 'लातूर पॅटर्न' उदयास आला. या पद्धतीमुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत डॉक्टर, इंजिनिअर आणि अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले.

# शरद पवार मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे मंगळवारी ब्रिच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असली तरी त्यांच्या तातडीने विविध तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्याचा अहवाल आल्यानंतरच पुढील उपचाराबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.



शरद पवार यांना नियमित तपासणी आणि काही वैद्यकीय चाचण्यांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या विविध चाचण्या करण्यात आल्या असून, अहवाल आल्यानंतरच त्यांच्या प्रकृतीबाबत स्पष्टपणे कळेल, अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना दिली.

दरम्यान, शरद पवार यांना मागील महिन्यातही प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुण्यातील रुग्णालयात दाखल केले होते. काही दिवस उपचार केल्यानंतर त्यांना घरी पाठविण्यात आले होते. मात्र, पुन्हा एकदा मंगळवारी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने त्यांचा बारामती दौराही रद्द करण्यात आला आहे.

# घरफोडी करणारी टोळी पोलिसांच्या ताब्यात, दहा गुन्हे उघड; ७९ लाखांचा मुद्देमाल जप्त

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोड्या करून फरार असलेल्या चोरट्यांना पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून शहरातील भाग्यनगर, शिवाजीनगर आणि विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या घरफोडीचे गुन्हे उघड केले. तसेच चोरट्यांच्या ताब्यातून ७८ लाख ३५ हजार ६० रुपयाचा सोन्या–चांदीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. या चोरांच्या टोळीसोबत एक अल्पवयीन आणि एका महिलेलाही अटक करण्यात आली आहे.



भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही महिन्यांपासून घरफोडीचे गुन्हे करून आरोपी फरार होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, सहायक पोलीस अधीक्षक परीविक्षाधीन शशांथ गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले व त्यांच्या सहकाऱ्यांनी अबिनाश कुमार यांच्या आदेशाचे पालन करत घरफोडीचे गुन्हे उघड करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी सोहेल अब्दुल सत्तार (वय १९ रा.जवाहर नगर तुप्पा), प्रदीप कुमार वीरेंद्र प्रसाद कौरी (वय १९ रा. धनेगाव बळीरामपूर), अर्जुन पुरुषोत्तम मोरे (वय २८ रा. चौफळा मरघाट), शेख नईम शेख मैनुद्दीन (वय २२ कैलास नगर नांदेड), आशा हरिश्चंद्र तेलंग (वय ५६ रा. शाहूनगर, नांदेड) आणि एक अल्पवयीन चोरटा पोलिसांच्या जाळ्यात अडकला.


या प्रकरणातील आरोपी सोहेल सत्तार, प्रदीप कौरी आणि एक अल्पवयीन बालक हे तिघेजण प्रत्यक्ष घरफोडी करायचे. चोरलेला मुद्देमाल अर्जुन मोरे, शेख नईम हे विक्री करायचे आणि या सर्वांना आशा तेलंग ही सहकार्य करायची व त्यांच्या संपर्कात असायची. पाच आरोपींना अटक केल्यानंतर त्यांच्याकडून पोलिसांनी ४४.५ तोळे वजनाचे ६८ लाख ८० हजार ८५० रुपयांचे सोन्याचे दागिने, १७१.४ तोळे वजनाचे ४ लाख ५४ हजार २१० रुपयांचे चांदीचे दागिने, एक मारुती कार, तीन दुचाकी व इतर ५ लाख रुपये असा ७८ लाख ३५ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या पाचही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांनाही न्यायालयाने पोलीस कोठडीत पाठवले आहे.

# फटाक्यांच्या गोदामात भीषण स्फोट; ६ जणांचा मृत्यू

**त्रिशूर (प्रतिनिधी)–** केरळच्या त्रिशूर जिल्ह्यातील मुंडाथिकोड गावात फटाक्यांच्या गोदामात भीषण आग आणि स्फोटाची घटना घडली आहे. या दुर्घटनेत किमान ६ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.

ही घटना वडक्कनचेरी नगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या मुंडाथिकोड गावात घडली. येथे आगामी २६ एप्रिल रोजी होणाऱ्या प्रसिद्ध त्रिशूर पूरम उत्सवासाठी फटाके आणि कच्चा माल एका शेडमध्ये साठवून ठेवण्यात आला होता. केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून मिळालेल्या माहितीनुसार, घटनास्थळावरून १३ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.




# मणिपुरमध्ये ५.२ रिश्टर तीव्रतेचा भूकंप

**मणिपूर (प्रतिनिधी)–** मणिपुरच्या अनेक भागांमध्ये मंगळवारी २१ एप्रिल रोजी पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.२ इतकी नोंदवण्यात आली असून, त्याचे केंद्र कामजोंग जिल्ह्यात होते.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीच्या माहितीनुसार, हा भूकंप सकाळी ५.५९ वाजता झाला. धक्के जाणवताच कामजोंग आणि आसपासच्या भागातील नागरिकांमध्ये घबराट पसरली आणि अनेकजण घाबरून घराबाहेर पडले. भूकंपाचे केंद्र अक्षांश २४.७०३ उत्तर आणि रेखांश ९४.४१५ पूर्व येथे, सुमारे ६२ किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगण्यात आले. या धक्क्यांचा परिणाम शेजारच्या नागालँड आणि आसाम राज्यांमध्येही जाणवला.



सुदैवाने, या घटनेत अद्याप कोणतीही जीवितहानी किंवा मोठ्या नुकसानीची माहिती मिळालेली नाही. यापूर्वी सोमवारी उत्तराखंडमधील पौडी गढवाल येथे रात्री ८.३२ वाजता रिश्टर स्केलवर ३ तीव्रतेचा भूकंप झाला होता, ज्याचे केंद्र सुमारे १० किलोमीटर खोलीवर होते. तसेच सोमवारी सकाळी जपानमध्ये ७.४ तीव्रतेचा भूकंप झाला होता. या भूकंपामुळे समुद्रात सुमारे ८० सेंटीमीटर उंच लाटा उसळल्या आणि किनाऱ्यावर आदळल्या. त्यानंतर जपानमध्ये सुनामीचा इशाराही देण्यात आला होता.

# सासरच्या मारहाणीत जावयाचा मृत्यू

## सासऱ्यासह दोन मेहुण्यांवर बिलोलीत गुन्हा दाखल; आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**बिलोली (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मौजे बडूर येथील लक्ष्मण मारुती इबितदार यांचा मौजे चिंचाळा येथील सासरच्या लोकांनी मुलीचे चांदीच्या बांगड्या का विकल्या या कारणावरून काठीने मारहाण केली होती. या मारहाणीत गंभीर दुखापत झालेल्या लक्ष्मण इबितदार यांचा दि.१८ एप्रिल रोजी नांदेड येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला असून याप्रकरणी सासऱ्यासह दोन मेहुण्यांवर बिलोली पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीनही आरोपी बिलोली पोलिसांच्या ताब्यात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

बिलोली तालुक्यातील मौजे बडूर येथील लक्ष्मण मारुती इबितदार (वय ३०) यांचा बिलोली तालुक्यातीलच मौजे चिंचाळा येथील नागोराव गंगाराम शिंदे यांच्या मुलीशी विवाह झाला होता. दि.११ एप्रिल रोजी ९.३० ते ११ वाजेच्यादरम्यान चिंचाळा येथे लक्ष्मण इबीतदार यास आरोपी नागोराव तुळशीराम शिंदे (सासरा), राम नागोराव शिंदे (मेहुणा) व गंगाधर नागोराव शिंदे (मेहुणा) यांनी संगणमत करून मुलीच्या चांदीच्या बांगड्या का विकल्या या कारणावरून शिवीगाळ करत काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले. जखमी लक्ष्मण यास उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र सासरच्याच्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या लक्ष्मण मारुती इबितदार यांचा दि.१८ एप्रिल रोजी उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताचा भाऊ अशोक मारुती इबितदार त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी नागोराव तुळशीराम शिंदे (मयताचा सासरा), राम नागोराव शिंदे (मेहुणा) व गंगाधर नागोराव शिंदे (मेहुणा) यांच्याविरुद्ध बिलोली पोलीस स्टेशन येथे गुरनं ७९/२०२६ कलम १०३(१), ३५२, ३(५) भारतीय न्याय संहिता–२०२३ कायदाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील तीनही आरोपी बिलोली पोलिसांच्या ताब्यात असल्याचे सांगण्यात आले.

सदर प्रकरणाचा पुढील तपास बिलोली पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक शिवराज लोखंडे हे करीत आहेत.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# यंदा पाऊस कमी पडणार?

भारतातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांच्या जीवनातील प्रत्येक महत्त्वाचा निर्णय, पेरणीपासून ते काढणीपर्यंत, मान्सूनच्या भरोशावर घेतला जातो. याचप्रमाणे उद्योग–व्यवसाय क्षेत्रात मागणी, गुंतवणूक आणि विस्ताराचे निर्णय घेताना पावसाचे चित्र लक्षात घेतले जाते. बँकिंग क्षेत्रालाही कर्जवाटप आणि वसुली यांसाठी मान्सूनचा अंदाज महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच मान्सून हा केवळ नैसर्गिक घटक नसून देशाच्या आर्थिक आराखड्याचा केंद्रबिंदू आहे. यावर्षी मात्र वर्तविण्यात आलेला पावसाचा हा अंदाज काळजीत टाकणारा आहे. सुरुवातीलाच 'अल निनो' सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करत मान्सून कमी पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. हा अहवाल खाजगी संस्थेकडून आलेला असला तरी त्यानंतर भारतीय हवामान विभागानेही आपल्या दीर्घकालीन अंदाजात पर्जन्यतुटीची शक्यता वर्तवली आहे. विशेषतः महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. 'अल निनो' ही प्रशांत महासागरातील उष्णतेशी संबंधित घटना असून तिचा भारतातील पावसावर प्रतिकूल परिणाम होतो, हे इतिहासातून वारंवार सिद्ध झाले आहे. जगभरातील हवामान अभ्यासकांच्या निष्कर्षांवर नजर टाकली, तरी यंदा मान्सून कमकुवत राहण्याचीच शक्यता अधिक दिसते. ही बाब केवळ आर्थिक दृष्टिकोनातून चिंताजनक नाही, तर सामाजिक आणि मानवी गरजांच्या दृष्टीनेही गंभीर आहे. १४० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात पिण्याचे पाणी आणि दैनंदिन वापरासाठी पुरेशा पाण्याची उपलब्धता ही अत्यावश्यक गरज आहे. या पार्श्वभूमीवर पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता म्हणजे एक मोठा इशारा आहे. 'स्कायमेट'ने सुमारे सहा टक्के, तर हवामान विभागाने आठ टक्क्यांपर्यंत पावसात घट होण्याचा अंदाज वर्तविल्याने चिंता अधिक गडद झाली आहे. आधीच जागतिक पातळीवरील अस्थिरतेमुळे वाढलेले इंधन दर, खनिज तेल व गॅसची टंचाई आणि त्यातून वाढलेली महागाई यामुळे सामान्य नागरिक त्रस्त आहे. अशा वेळी मान्सूनही दगा देण्याची शक्यता असल्यास त्याचा परिणाम थेट जनजीवनावर होणार, यात शंका नाही. शेती उत्पादन घटल्यास अन्नधान्याच्या किमती वाढतात, रोजगारावर परिणाम होतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्था डळमळीत होते. परिणामी संपूर्ण अर्थचक्रावर त्याचे पडसाद उमटतात. इतिहास पाहिला, तर 'अल निनो'च्या वर्षांमध्ये अनेकदा भीषण दुष्काळ पडलेले आहेत. २००२ मध्ये पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटल्याने देशातील अनेक राज्यांमध्ये दुष्काळ जाहीर करावा लागला होता. २०१५ मध्ये महाराष्ट्रातील लातूरसारख्या भागात पाण्याची टंचाई इतकी तीव्र झाली की, रेल्वेने पाणी पुरवठा करण्याची वेळ आली. हे अनुभव लक्षात घेतले, तर मान्सूनच्या अनिश्चिततेकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. तथापि, हवामानशास्त्रातील काही सकारात्मक घटकही या चित्राला काही प्रमाणात बदलू शकतात. उदाहरणार्थ, 'इंडियन ओशन डायपोल' ही घटना मान्सूनला बळकटी देऊ शकते. हिंदी महासागराच्या पश्चिम भागात तापमान अधिक वाढल्यास 'सकारात्मक आयओडी' तयार होते आणि त्यातून भारताकडे अधिक आर्द्र वारे वाहून येतात. १९९७ मध्ये प्रबळ 'अल निनो' असूनही सकारात्मक आयओडीमुळे भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला होता. तसेच २०१९ मध्येही या घटकामुळे मान्सूनला आधार मिळाला होता. यामुळेच हवामानाचे गणित केवळ एका घटकावर अवलंबून नसून अनेक घटकांच्या परस्परसंबंधांवर ठरते, हे स्पष्ट होते. गेल्या काही वर्षांत 'अल निना'च्या प्रभावामुळे देशात समाधानकारक पाऊस झाला होता. त्याचा परिणाम म्हणून अनेक जलाशयांमध्ये चांगला पाणीसाठा उपलब्ध आहे. सध्या देशातील प्रमुख जलाशयांमध्ये सुमारे ४४ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची स्थिती काही प्रमाणात दिलासा देणारी आहे. मात्र, ही साठवणूक कायमस्वरूपी उपाय नाही. आगामी काळात पावसाची अनिश्चितता लक्षात घेता जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि पर्यायी उपाययोजना यावर अधिक भर देणे गरजेचे आहे. कारण मान्सून हा केवळ हवामानाचा विषय नसून देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि मानवी भवितव्याशी निगडित आहे. संभाव्य पर्जन्यतुटीच्या पार्श्वभूमीवर शासन, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे सजग राहण्याची गरज आहे. दीर्घकालीन नियोजन, शाश्वत जलव्यवस्थापन आणि हवामान बदलांच्या परिणामांना सामोरे जाण्याची तयारी, यातूनच या आव्हानाला समर्थपणे तोंड देता येईल. मान्सूनवर अवलंबून राहण्याबरोबरच त्याच्या अनिश्चिततेला स्वीकारून त्यानुसार धोरणात्मक बदल करणे, ही काळाची गरज आहे.

# वसुंधरेची आर्त हाक : विकासाच्या वाटेवर शाश्वतपणाचा ध्यास



दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ दिनविशेष नसून पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली एक गंभीर जाणीव आहे. मानवाने विज्ञान–तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अभूतपूर्व विकास साधला असला तरी या विकासाच्या बदल्यात पृथ्वीच्या संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट यांसारख्या समस्यांनी आज संपूर्ण जगाला वेढले आहे. अशा परिस्थितीत वसुंधरा दिन हा केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक आहे. पृथ्वी ही आपली केवळ राहण्याची जागा नसून ती आपली 'आई' आहे, जी आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि जीवन देत असते. त्यामुळे तिच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकाची नैतिक कर्तव्य आहे.

वसुंधरा दिनाची सुरुवात १९७० साली झाली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा हा एक मोठा जागतिक उपक्रम ठरला. सुरुवातीला काही देशांपुरता मर्यादित असलेला हा दिवस आज जगभरातील जवळपास सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचे विविध कार्यक्रम, मोहिमा, जनजागृती उपक्रम राबवले जातात. परंतु केवळ एक दिवस साजरा करून पर्यावरण वाचणार नाही, तर हा विचार आपल्या दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला पर्यावरणीय संकटाचे स्वरूप अत्यंत भीषण झाले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकाने वापर होत आहे. जंगलांची मोठ्या प्रमाणात तोड केली जात आहे, ज्यामुळे वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषणाने ग्रासले आहेत. हवेत विषारी वायूंचे प्रमाण वाढले आहे. या सर्व घटकांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्याला 'जागतिक तापमानवाढ' असे म्हणतात. या तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मानवी जीवनच धोक्यात आले आहे.

हवामान बदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे, तर काही ठिकाणी दुष्काळाचे संकट निर्माण होत आहे. कृषी क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान सहन करावे लागत आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समस्यांचा परिणाम केवळ निसर्गावरच नव्हे, तर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होत आहे.

पर्यावरणाच्या ऱ्हासामागे मानवी हस्तक्षेप हा प्रमुख कारण आहे. 'विकास' या नावाखाली आपण निसर्गाचा विनाश करत आहोत. मोठमोठे प्रकल्प, धरणे, रस्ते, कारखाने यासाठी जंगलांची तोड केली जाते. नद्या वळविल्या जातात. खनिज संपत्तीच्या उत्खननासाठी पर्वत उध्वस्त केले जातात. या सर्व प्रक्रियेमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. निसर्गाच्या या असंतुलनाचा परिणाम शेवटी मानवावरच होतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे.

'शाश्वत विकास' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर पुढे आली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास, जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. म्हणजेच, नैसर्गिक संसाधनांचा वापर करताना त्यांचे संवर्धन आणि पुनर्निर्मिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. ऊर्जा, पाणी, जमीन यांचा वापर मर्यादित आणि योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब, कचऱ्याचे पुनर्वापर यांसारख्या उपाययोजना यासाठी महत्त्वाच्या आहेत.

जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवनाचा पाया आहे. विविध प्रकारचे वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. परंतु मानवी क्रियांमुळे जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जंगलांचे संवर्धन, वन्यजीव संरक्षण, नैसर्गिक अधिवासांचे जतन यावर भर देणे गरजेचे आहे.

जलसंकट ही आणखी एक गंभीर समस्या आहे. पाणी हे जीवनासाठी अत्यावश्यक आहे. परंतु आज अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. भूजलाचा अतिरेकाने वापर, पावसाच्या पाण्याचा अपुरा साठवण, नद्यांचे प्रदूषण यामुळे जलस्रोत आटत आहेत. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा योग्य वापर, जलप्रदूषण रोखणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

कचरा व्यवस्थापन हा देखील पर्यावरण संवर्धनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिकचा वाढता वापर हा पर्यावरणासाठी मोठा धोका ठरला आहे. प्लास्टिक विघटनास खूप वेळ लागतो, त्यामुळे ते जमिनीवर, पाण्यात साचून राहते आणि प्रदूषण वाढवते. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. 'कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा मंत्र अंगीकारणे गरजेचे आहे.

पर्यावरण संवर्धनात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शिक्षण प्रणालीत पर्यावरण शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लहानपणा–पासूनच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

शासन आणि धोरणे यांचीही पर्यावरण संवर्धनात महत्त्वाची भूमिका आहे. पर्यावरणपूरक धोरणे राबवणे, प्रदूषण नियंत्रणाचे नियम कडक करणे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे यासाठी शासनाने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे. परंतु केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आजच्या काळात तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून पर्यावरण संवर्धन शक्य आहे. सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जल ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर, हरित इमारतींची उभारणी, स्मार्ट शहरांची संकल्पना यामुळे पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो.

वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने काही ठोस संकल्प करणे आवश्यक आहे. झाडे लावणे, पाणी वाचवणे, कचरा कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारख्या लहान उपाययोजना देखील मोठा फरक घडवू शकतात. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून ती आपल्या अस्तित्वाची गरज आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर पर्यावरणीय समस्या या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी निगडित आहेत. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता, संसाधनांचे असमान वितरण, गरिबी, लोकसंख्येचा दबाव यामुळे पर्यावरणावर ताण वाढतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधला जाईल.

शेवटी, वसुंधरा दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून आपण तिचे केवळ पालक आहोत. पुढील पिढ्यांसाठी ही पृथ्वी सुरक्षित आणि समृद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील पिढ्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे आता वेळ आली आहे, की आपण विकासाच्या नव्या वाटा शोधू, ज्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत असतील. वसुंधरेच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले, तरच पृथ्वीवरील जीवनाचा प्रवाह अखंडित राहील.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली,
मो.९९६०१०३५८२

# पृथ्वीला महाविनाशापासून वाचविण्यासाठी संकल्पाची गरज



पृथ्वीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा कमी होत आहे ही घटना कोरोना महामारीच्या रूपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पाहिली. यामुळे जगात लाखोंच्या संख्येने जीवित हानी सुध्दा झाली. याकरिता पृथ्वीला वाचविण्यासाठी सर्वांनी संकल्प करण्याची गरज आहे.

जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून जागतिक पृथ्वी दिवस साजरा करण्यात येतो. प्लास्टीकपासून होणारे प्रदूषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीकपासून होणारे प्रदूषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदूषणापासून मुक्त झाले. भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदूषण दूर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परिस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होताना दिसून येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छिन्न–विछीन्न झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दिसून येतात. यामुळे संपूर्ण जगात स्थल–प्रदूषण, वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होताना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहिला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, त्सुनामी, महाप्रलय, महामारी, साथीचे रोग, अती पाऊस, अती उष्णता, अती थंडी अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दिसून येतात. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की, अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार, अनुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेल्या आहेत. आता तर बायोवेपन्स म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे. यामुळे पृथ्वीचा ऱ्हास होवू शकतो.

आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा वापर करीत आहे. यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजन दिवसेंदिवस कमी होताना दिसते. सध्याच्या परिस्थितीत चिन जैविक हत्यार बनविणारा देश बनलेला आहे. चिन असा देश बनला आहे की, नेहमीच तो जैविक हत्याराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो. २०१९ मध्ये चिनने कोरोना व्हायरसचे परीक्षण करून मानवजातीसोबत खुनी तांडव केल्याचे दिसून आले. आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चिन पृथ्वीचा सर्वनाश करताना दिसतो. आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी–नाले, तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दिसतात. यामुळे दिवसेंदिवस पृथ्वीच्या तापमानात व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिंगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे. पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे–मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण, बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दिसतात. हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ऱ्हास होत आहे व जंगली प्राण्यांचे जीवन धोक्यात आलेले आहे. यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. त्यातूनच १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस म्हणून साजरा केला जातो. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत. या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे. त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पाहिला आहे. परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचविले पाहिजे. वृक्षारोपण केले पाहिजे. ज्यांच्या परिसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावून पृथ्वी दिवस साजरा करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे–छोटे तलाव बांधून जंगली प्राण्यांचे प्राण वाचवून संगोपन करायला हवे. कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु–पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे. या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक पशु–पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्त्वाची भूमिका बजावीत असते.

आज मानवाची रक्षा करण्याकरिता पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प जगातील संपूर्ण राष्ट्रांनी करायला पाहिजे. आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवू शकते. कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागताना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे. त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की. याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमिनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल. यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल. यामुळे विहिरी, तलाव व नदी–नाले नेहमी जलमग्न राहील. आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे. म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिनीच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत.

मानवाची जमिनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० ते ६० फुटांपर्यंत आहे.परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही. कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे.परंतु मानवाला अजूनपर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल होतांना दिसतो. वनवा लागणे, महाप्रलय येणे, हिमकडा कोसळणे, उष्णतामान वाढणे, भूकंप येणे, त्सुनामी येणे ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वत:हुन ओढवलेल्या आहेत. यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जीवित हानी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो. यामुळे आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. पृथ्वीला वाचविणे म्हणजे महायुध्द जिंकण्यासारखेच आहे. हे महायुध्द जिंकण्यासाठी जगातून सर्वच स्तरातून प्रयत्न व्हावयास पाहिजे. आज संपूर्ण जग कठीण घडीतून प्रवेश करीत आहे. संपूर्ण मानवजातीपुढे तीन प्रश्न उभे ठाकले आहेत एक आहे पृथ्वीचे रक्षण, दुसरे म्हणजे वैश्विक महामारी–पासून सुटका आणि तिसरे म्हणजे तिसऱ्या महायुद्धापासून जगाला वाचविणे याबाबी तेव्हाच शक्य होवू शकते जेव्हा मानवजात खरी माणुसकी दाखवेल. कारण दिवसेंदिवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढून पृथ्वीवरील जमिनीचा भूभाग कमी होताना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबविला पाहिजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. यामुळे पृथ्वीचे रक्षण होईल व खऱ्याअर्थाने पृथ्वी दिवस मानल्या जाईल.


पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं ही बाब मानवजातीने लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण केले पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वीवर तिसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवतांना दिसत आहे. कारण युक्रेन युद्ध पहाता अमेरिका, रशिया, चीन, उत्तर कोरिया, जापान, इराण, इराक, इजरायल, ब्रिटन एकमेकांच्या विरोधात अनुबॉम्बच्या किंवा अत्याधुनिक मिसाईलच्या धमक्या देतांना दिसतात. यामुळे पृथ्वीचा विनाश केव्हाही होवू शकतो याला ताबडतोब थांबायला हवे. पृथ्वी दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह व विनंती करतो की, नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगलतोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा. यामुळे गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल. पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मूलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा.

**–रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# यशस्वी जीवनाची सात सूत्रे

आपले जीवन आनंदमय, सुखमय आणि यशस्वी बणविणे हे आपल्याच हातात आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. सुखी जीवनाचे काही सूत्र आहेत त्या प्रमाणे वाटचाल केली तर नक्कीच आपण सुखी राहू यात शंकाच नाही. परंतु आपण मृगजळामागे लागून निराशाच पदरी पाडून घेतो.आणि याच घटनांमुळे आपण, आपल्या दु:खांमध्ये आणखी भर घालत राहतो. याप्रमाणेच भर पडत गेल्यास जीवनाचं काय होईल याचा विचार न केलेलाच बरा. हे सर्व टाळण्यासाठी आपण काही सुत्रांचा विचार करू. सुत्रे जर अंमलात आणली तर जीवन सुकर होईल असे वाटते.

१) आरसा– रोजच्या कार्याला सुरुवात करण्यापूर्वी आपण आरसा बघावा. आससयामध्ये आपली प्रतिमा आपल्याला स्पष्टपणे दिसते. आरसा आपल्याला केव्हाही खोटं बोलू देत नाही. म्हणूनच प्रत्येकांचे घराच्या बाहेर पडण्याच्या दरवाज्या जवळ आरसा लावण्याची योजना



असावी की, बाहेर पडणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला तो दिसावा. आणि त्याला त्याचे प्रतिबिंब त्या आरशात दिसावे . आरसा त्या व्यक्तीला आठवण करून देतो की, आज जे कार्य तुम्ही करणार प्रामाणिक पणे करा खोट्याचा आधार मुळीच घेऊ नका.

२) ज्ञान– कोणतेही काम हाती घ्यायचे असल्यास त्या विषयी संपूर्ण माहिती करून घेणे हितकारक आहे. आपले ज्ञान किंवा माहिती आपल्याला कदापी घाबरू देत नाही.आपल्याला जर काही माहितीच नसली किंवा त्या विषयी काही ज्ञान नसल्याने आपण काही बोलूच शकत नाही. आणि त्यामुळे वेळेवर आपली घाबरगुंडी उडते.

३) सत्य – आपले कोणतेही काम आपण सत्याचे मार्गाने करत असेल तर, सत्य हे मानसाला कमकुवत होऊ देत नाही. सत्य हे नेहमीच शक्ती किंवा उर्जा देत राहते. आणि हिच उर्जा प्रत्येक व्यक्तीला नवप्रेरणा देत राहते. सत्य हे नेहमी सत्यच असतं. अगदी पांढरे शुभ्र, पारदर्शक असते. म्हणून ते कुठेही डगमगत नाही.

४) प्रेम– आपला व्यवहार नेहमी प्रेमाचा असावा. असं म्हणतात की, प्रेमामुळे जग सुद्धा जिंकता येते. आणि असाध्य ते साध्य होऊ शकते. आपण एखाद्या प्राण्यावर जरी प्रेम, माया केली तर तो प्राणी किंवा पशू सुद्धा आपल्यावर तितकेच प्रेम करतो हे आपण नेहमीच अनुभवतो . हिंस्र पशू सुद्धा प्रेमाने जवळ येताच. आपल्याला याचं दर्शन बाबा आमटे यांच्या प्रकल्पामध्ये झाल्याशिवाय राहत नाही. या वरून आपल्या लक्षात येते की, प्रेमा मध्ये किती शक्ती आहे.

५)कर्म – आपण नेहमी कर्ममग्न असावे आणि तेही निष्काम कर्म असावे. गीता या ग्रंथामध्ये सांगितल्याप्रमाणे कर्म असावे. जी व्यक्ती निष्काम कार्यरत असते ती व्यक्ती जीवनात यशस्वी होईलच . म्हणूनच फार पूर्वी सुद्धा याच गोष्टिला महत्त्व दिलेलं आहे. आणि त्याचसाठी एक म्हण सुद्धा तयार करून ठेवलेली आहे.

थांबला तो संपला यातून हेच शिकावं की, मानसाने न थांबता कार्य करीत रहावे.

६) विश्वास – आपण जे कार्य हाती घेणार त्या विषयी आपणास विश्वास असावा. आणि तो विश्वासच जर नसेल तरकोणतंही कार्य सुरळीतपणे पार पडणार नाहीच.आणि हाच विश्वास कदापी दु:खी होऊ देणार नाही.

७) अध्यात्म – अध्यात्म आपणास कोणत्याही विषयाचा मोह होऊ देत नाही. अती मोह मानसाला कोठे नेऊन ठेवतो हे सगळ्यांना माहीत आहे. अतिमोहापायी भले भले बरबाद झालेले आहेत. म्हणून प्रत्त्येक व्यक्तींनी मोह टाळण्याचा प्रयत्न करावा. जीवनात या सुत्राचा अंमल केला तर आपले जीवन यशस्वी होईल असा विश्वास वाटतो.

**–रामदास राजेगावकर**
मेहकर, जि. बुलडाणा.
मो. ९४२०२३३०३२.

# सहाव्या सुजल ग्रामसंवाद राज्यस्तरीय कार्यक्रमासाठी धनगरवाडी गावाची निवड

## दूरदृश्य प्रणालीद्वारे आज ग्रामस्थांशी संवाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –जलजीवन मिशन व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सहाव्या सुजल ग्रामसंवाद या दूरदृश्य प्रणालीवरील ग्रामसंवाद कार्यक्रमासाठी नांदेड तालुक्यातील धनगरवाडी गावाची निवड करण्यात आली आहे.

हा कार्यक्रम बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला असून, ग्रामपंचायत स्तरावरील गाव पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्य, शिक्षक, विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच जल सुरक्षक यांच्यासोबत नाविन्यपूर्ण उपक्रमांवर चर्चा करण्यात येणार आहे. या उपक्रमात या विभागाचे केंद्र व राज्याचे मंत्री महोदय संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सेवा अधिक सक्षम करणे, समुदाय सहभाग वाढविणे आणि स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे




हा आहे. कार्यक्रमात नांदेड जिल्ह्याच्या वतीने धनगरवाडी गावास १० मिनिटांचे सादरीकरण, जिल्हास्तरावरून ३ मिनिटे तर राज्यस्तरावरून २ मिनिटे वेळ देण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील किमान २० 'हर घर जल' घोषित करण्यात आलेल्या ग्रामपंचायतीही या कार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होणार आहेत. सुजल ग्रामसंवादात राज्यातून एकमेव धनगरवाडी ग्रामपंचायतीची निवड झाली आहे. या कार्यक्रमामुळे नांदेड जिल्ह्यातील यशस्वी जलव्यवस्थापन व ग्रामस्तरीय उपक्रम राज्यासमोर मांडण्याची संधी उपलब्ध झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड व कार्यकारी अभियंता राहूल रावसाहेब यांनी दिली आहे.

जम्मू-काश्मीर, लढाख, राजस्थान, मिझोरम, तेलंगणा, झारखंड, त्रिपुरा, कर्नाटक, छत्तीसगड या दहा राज्यांतील सोळा ग्रामपंचायती सहाव्या सुजल ग्रामसंवाद कार्यक्रमात सहभागी होणार असून, या ग्रामपंचायतींच्या पदाधिकारी, अधिकारी तसेच राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे जलशक्ती मंत्री (पेयजल आणि स्वच्छता) सी. आर. पाटील आज संवाद साधणार आहेत.

सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपविभागीय अभियंता एस. डी. देशमुख, जलजीवन मिशनचे माहिती, शिक्षण व संवाद सल्लागार डॉ. नंदलाल लोकडे, कनिष्ठ अभियंता पार्थ कुलकर्णी, पाणी गुणवत्ता समन्वयक कपेंद्र देसाई, मनुष्यबळ विकास समन्वय सुशील मानवतकर आदी परिश्रम घेत आहेत.

## लोहा-कंधार बांधकाम कामगार स्थानिक स्वराज्य नियंत्रण समितीची कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा -कंधार बांधकाम कामगार स्थानिक स्वराज्य संस्थानिक स्वराज्य नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. लोहा -कंधार बांधकाम कामगार स्थानिक स्वराज्य नियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची तर सदस्यपदी चितळीचे सरपंच अविनाश पाटील सूर्यवंशी, देवला तांडाचे माजी सरपंच अर्जुन राठोड, कल्पना किशनराव गिते, बोरगाव किवळाचे माजी सरपंच धनाजी देवराव आढाव यांची निवड करण्यात आली आहे.

बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांच्या अधिपत्याखाली कार्य करणाऱ्या बांधकाम कामगार स्थानिक सहनियंत्रण समिती नुकतीच गठीत झाली आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली सदरील समिती ही लोहा-कंधार मतदारसंघातील कामगार आणि कष्टकऱ्यांच्या हितासाठी कार्य करणार असल्याची माहिती लोहा -कंधार बांधकाम कामगार स्थानिक स्वराज्य नियंत्रण समितीचे नवनियुक्त सदस्य अविनाश पाटील सूर्यवंशी यांनी दिली.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते कंधारमध्ये गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार




**कंधार (प्रतिनिधी)**– कंधारमधील गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थी व पालकांच्या सत्कार समारंभास उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक जाधव, सहायक पोलीस निरीक्षक निलपत्रेवार, डॉ. अशोक जायभाये, डॉ. केंद्रे, डॉ. कागणे, भास्कर पाटील तिडके, ह.भ.प. नारायण महाराज, ह.भ.प. तिडके महाराज, पोलीस हवालदार गंगाधर घुगे व श्रीकांत कांबळे, मुंडे करिअर अकाडमीचे सर्व शिक्षक वर्ग, कंधार शहरातील प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

कंधार येथील मुंडे करिअर अकॅडमीचे पोलीस भरती, आर्मी, वनरक्षक, तलाठी, ग्रामसेवक अशा विविध पदांवर नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या वर्षी मुंडे करिअर अकादमीचे नांदेड जिल्ह्यात ३६ विद्यार्थी पोलीस दलात भरती झाले आहेत. अकॅडमीचे महाराष्ट्रात आतापर्यंत लागलेल्या निकालात १०० हून अधिक विद्यार्थी नोकरीला लागले आहेत.

यावेळी शहाजी उमाप यांनी नवनियुक्त पोलिसांनी येणाऱ्या काळात आपण काम करतेवेळी आपल्याकडे पोलीस स्टेशनला येणारे तक्रारदार यांच्यात आपण आपले आई, वडील, भाऊ, बहीण समजून त्यांचे काम करावे, असे आवाहन केले.

पोलीस दलात नव्याने भरती होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आपल्या ३० ते ३५ वर्षाच्या सेवाकाळात गोरगरीब जनतेची सेवा करण्याची चांगली संधी मिळाली आहे, असे शहाजी उमाप यांनी सांगत पुढील काळास त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमापूर्वी यशस्वी विद्यार्थी व पालकांची कंधार शहरातून मिरवणूक काढण्यात आली.

# शिवाजीराजे पाटील यांचा एफडीपी उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकास साधण्यासाठी राज्यभरात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे शिक्षणयात्री इंजि. पुरुषोत्तम खेडेकर, राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष दिलीप पारेकर, एलकेएम ज्ञानांगण शैक्षणिक संकुलाचे संचालक प्रा. डॉ. नामदेव दळवी, प्रा. आबासाहेब सावंत, प्राचार्य संजय पाटील शेळगावकर, अंशुल पब्लिक स्कूलचे अध्यक्ष ईश्वर पाटील इंगोले, साई इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक प्रा. ज्ञानेश्वर कदम वारंगेकर व इंजि. आकाश माधसवाड यांच्या संकल्पनेतून व्यक्तिमत्त्व विकास तज्ज्ञ इंजि शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी आयोजित केलेला एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी खोलेश्वर शैक्षणिक व बँकिंग संकुलाच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र शिवाजीराजे पाटील यांच्या ऊर्जावान, उत्साहपूर्ण आणि जोशपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांना प्रेरित




केले. देशभरातील शैक्षणिक व बँकिंग क्षेत्रातील मान्यवरांनी या एफडीपीचे विशेष कौतुक केले आहे. या शिबिरात पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड, ताणतणाव व्यवस्थापन, पॉझिटिव्ह पॅरेंटिंग, अर्थसाक्षरता, लाईफ स्किल्स, प्रभावी संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, बॉडी लँग्वेज, नेतृत्व कौशल्य, स्टेज करेज तसेच सकारात्मक वैज्ञानिक दृष्टिकोन अशा जीवनसाक्षरतेशी संबंधित विविध विषयांवर शिवाजीराजे पाटील यांनी खुमासदार शैलीत मार्गदर्शन केले.

या प्रसंगी खोलेश्वर बँकेचे सीईओ विलास पारेकर, प्राचार्य सरिता फपाळ, उद्योजक रामचंद्र जाधव असर्जनकर, डॉ. इजहार देशमुख, उद्योजक नागेश कानडे, भगवान पवार आमदुरेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मोहिनी फपाळ, प्रा. आफ्रिन पठाण, प्रा. अर्चना नाईकवाडे, दत्ता केकान, प्रा अक्षय जाधव, प्रा. उस्मान शेख, रायभान मुळे, महादेव वनवे, प्रा. लखन नाईकवाडे, प्रा. राहुल लोंढे, प्रा. रामेश्वर लगचकर, प्रा. शुभांगी जोशी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नांदेड विभागात जागतिक वारसा दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** – दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात जागतिक वारसा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी तसेच वारसा संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जागतिक थीम आपत्ती व संघर्षाच्या परिस्थितीत जिवंत वारशासाठी आपत्कालीन प्रतिसाद या अनुषंगाने विभागीय रेल्वे कार्यालय संकुल (DOC) उद्यानातील स्टीम क्रेन स्थळी कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यानिमित्ताने आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमात विभागात जतन करण्यात आलेल्या भारतीय रेल्वेच्या महत्त्वपूर्ण वस्तूंचे प्रदर्शनही




भरविण्यात आले. यात DRM कार्यालय परिसरात प्रदर्शित ३५ टन क्षमतेचा स्टीम क्रेन व नॅरो-गेज डिझेल लोकोमोटिव्ह (ZDM-४), तसेच छत्रपती संभाजीनगर स्थानकावर जतन केलेले ऐतिहासिक YP वर्ग स्टीम लोकोमोटिव्ह (१९६५) यांचा समावेश आहे.

हे वारसा घटक भारतीय रेल्वेचा समृद्ध इतिहास व तांत्रिक प्रगती दर्शवतात. विशेषतः आपत्ती व संकटाच्या काळात अशा ऐतिहासिक वारशाचे संरक्षण करणे किती महत्त्वाचे आहे, यावर या कार्यक्रमात भर देण्यात आला, जेणेकरून पुढील पिढ्यांसाठी हे वारसास्थळ सुरक्षित राहतील.

## भूअलंकरण दिवसानिमित्त संस्कार भारतीच्या वतीने आज रांगोळी साकारणार

**नांदेड (प्रतिनिधी)**– भूअलंकरण दिवसानिमित्त संस्कार भारती नांदेडच्यावतीने रांगोळी काढली जाणार आहे. दि. २२ एप्रिल हा दिवस वसुंधरा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. त्यानिमित्ताने नांदेड शहरात दत्त मंदिर लोकमित्र नगर डी. मार्ट रोड व महावीर चौक हनुमानपेठ (वजीराबाद) या दोन ठिकाणी संस्कार भारतीचे रांगोळी कलाकार रांगोळी साकारणार आहेत.

नांदेडकरांनी या ठिकाणी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन संस्कार भारती नांदेड महानगराध्यक्षा सौ. राधिका वाळवेकर, कार्याध्यक्ष जयंत वाकोडकर, सचिव सौ. अंजली देशमुख, दृश्यकला संयोजक सौ. अंजली कुलकर्णी आणि देवगिरी प्रांत महामंत्री डॉ. जगदीश देशमुख, कार्याध्यक्ष भगवानराव देशमुख, उपाध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख यांनी केले आहे.




**नांदेड** : अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया जनगणना होईपर्यंत स्थगित करण्याबाबत आणि न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल जाहीर करण्यात यावा या मागणीसाठी नांदेड जिल्ह्यातील ५९ जातींचे प्रतिनिधी, आंबेडकरी अनुयायी आणि संविधान जागृत नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंगळवारी धरणे आंदोलन केले. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# लोहा शहरात उघड्यावरील मांसविक्री थांबविण्याची मागणी

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरात उघड्यावरील मांसविक्री त्वरित थांबविण्यात यावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

लोहा शहरातील गजबजलेल्या भागात उघड्यावर होणारी मांसविक्री, बेशिस्त वाहतुकीमुळे रहदारीची कोंडी, हातगाड्यांची नको तेथे पार्किंग, दोन्ही बाजूने नालीवर अतिक्रमणे, दोन्ही बाजूच्या नाल्या मोकळ्या करण्यात याव्यात अशी मागणीही करण्यात येत आहे. लोहा शहराच्या हितासाठी उपयुक्त ठरणाऱ्या बाबींकडे आमदार चिखलीकर व लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार यांचे लक्ष वेधले आहे.

लोहा शहरातील बसस्थानक, शिवाजीचौक, बेरळी फाटा व शहराच्या मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूस नालीचे काम झाले, पण त्यावर दुकानदारांनी अतिक्रमणे करीत बांधकाम केले आहे. मुख्य रस्त्यावर आलमारी, दुकान, टपऱ्या, हातगाडे अनधिकृतरित्या असून, त्याचा किरायाही वसूल करण्यात येतो आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. संपूर्ण मुख्य रस्ता अनधिकृत अतिक्रमणाच्या विळख्यात गेला आहे.

गंगाखेड, लातूर, कंधार व नांदेडहुन येणाऱ्या रस्त्याने लोहा शहरात प्रवेश करीत असताना रस्त्याच्या बाजूला अनाधिकृत मटण, चिकनची दुकाने थाटली आहेत. तसेच शहरातसुद्धा वर्दळीच्या ठिकाणी उघड्यावर मांस विक्री केली जात आहे. त्याची दुर्गंध तसेच शाकाहारी जनतेची होणारी कुचंबना थांबविण्यासाठी ती हटवावी व एकाच छताखाली त्याची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

लोहा शहरातील भाजीपाला विक्रेते भाजी मंडईमध्ये दुकाने न लावता शहराच्या मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूने भाजीपाल्याची विक्री करतात. त्याचा वाहतुकीला मोठा अडथळा होत आहे. तेव्हा या प्रकरणी मनपा प्रशासनाने लक्ष घालून शहरातील नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करावी, अशी मागणी होत आहे.

## करिअर कट्टा उपक्रमाच्या नांदेड जिल्हा समन्वयकपदी प्रा. एकनाथ पावडे यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत नांदेड जिल्हा समन्वयक म्हणून प्रा. एकनाथ धुराजी पावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव, नेतृत्वगुण तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती करण्यात आली आहे.



या नियुक्तीपत्रासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व विभाभागाचे प्रमुख डॉ. चव्हाण यांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.

या नियुक्तीबद्दल खा. नागेश पाटील आष्टीकर आणि हदगाव तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कृष्णा पाटील आष्टीकर यांनी प्रा. पावडे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. डी. एस. काकडे आणि तालुका समन्वयक प्रा. किशोर दवणे यांनीही अभिनंदन केले.

करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा तयारी, व्यक्तिमत्व विकास तसेच विविध क्षेत्रांतील संधींबाबत माहिती देण्यासाठी राबविण्यात येतो. नांदेड जिल्हा समन्वयक म्हणून प्रा. पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमास अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# भाजपा महानगर चिटणीसपदी तातेराव पाटील यांची नियुक्ती



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय जनता पार्टी महानगर चिटणीसपदी भाजपाचे कार्यकर्ते तातेराव पाटील यांची महानगर अध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर यांनी नियुक्ती केली आहे.

यावेळी तातेराव जाधव यांना नियुक्तीपत्र देताना महानगराध्यक्ष अमर राजूरकर, माजी अध्यक्ष प्रवीण साले, महानगर सरचिटणीस विजय येवनकर, माजी नगरसेवक बालाजीराव जाधव, विजय गंभीरे, जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, माजी नगरसेवक राजू पाटील काळे, किशन कल्याणकर, उमेश चव्हाण, अमित वाघ इत्यादी उपस्थित होते.

या निवडीबद्दल नारायण पाटील लुटे, गोविंदराव पाटील धुमाळ, बालाजी पर्वतराव पाटील धुमाळ, भीमराव पाटील धुमाळ, सुदाम पाटील जाधव, नारायण पाटील जाधव, रामचंद्र पाटील जाधव, दादाराव धुमाळ, ज्ञानेश्वर वैद्य, रमेश बकाल यांच्यासह गावकरी व मित्र परिवार यांनी तातेराव पाटील यांचा सत्कार करून आगामी कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## माहिती अधिकार संरक्षण समितीच्या नांदेड जिल्हा उपाध्यक्षपदी डॉ. शिवाजी वासरे

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)**– तग्याळ येथील सुपुत्र डॉ. शिवाजी सुदामराव वासरे यांची माहिती अधिकार संरक्षण समितीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



केंद्र व राज्य शासनाच्या जनहिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००४ अंतर्गत नागरिकांना माहिती मिळवून देणे, भ्रष्टाचार निर्मूलनासाठी कार्य करणे व जनजागृती करणे या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. शिवाजी वासरे यांच्या नियुक्तीबद्दल परिसरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## बसवण्णा, फुले, आंबेडकर व गाडगे बाबा जयंतीनिमित्त महिला सन्मान मेळावा व पुरस्कार सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– म. बसवण्णा, म. जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त नांदेड येथे पुढील महिन्यात महिला सन्मान मेळावा व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सामाजिक समतेचे अग्रदूत व महिलांचे उद्धारकर्ते महात्मा बसवण्णा यांची ८९५ वी जयंती (१९ एप्रिल), म. जोतीराव फुले यांची १९९ वी जयंती (११ एप्रिल), भारतरत्न डॉ. आंबेडकर यांची १३५ वी जयंती (१४ एप्रिल) आणि राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची १५० वी जयंती (२३ फेब्रुवारी) यानिमित्त नांदेड येथे मे २०२६ या महिन्यात महिला सन्मान मेळावा व खास महिलांसाठी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

## मथुराबाई कांबळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील मौजे कलंबर बु. येथील ज्येष्ठ नागरिक मथुराबाई भुजंगराव कांबळे (वय ९०) यांचे मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता कलंबर बु. येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# परशुराम मंदिर येथे विष्णू याग संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त परिमल नगर येथील परशुराम मंदिरात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी विष्णू याग तसेच १२१ ब्राह्मणांना पूजन व शिधावाटप करण्यात आले. यामध्ये पंचकुंडात्मक विष्णू याग यामध्ये विशेष आकर्षण रेणुका भजन मंडळी लोकमित्र नगर यांनी विविध भजन व नाम संकीर्तन केले. भगवान परशुरामाची महाआरती व महाप्रसाद याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी खा. डॉ. अजित गोपछडे, आ. बालाजी कल्याणकर, माजी. आ. अमरनाथ राजुरकर, भाजपा उ. बापू देशमुख, संजय कोडगे, प्रवीण साले, नगरसेवक मिलिंद देशमुख, किशोर भवरे, आशिष नेरळकर, एडवोकेट महेश कनकदंडे राजू यन्नम, शांभवी साले, बिलोली च्या नगरसेविका मैथिलीताई कुलकर्णी प्रजावाणीचे संचालक रवीकाका डोईफोडे, उद्योजक बलभीम रेणापूरकर, संतोष परळीकर, सचिन उमरेकर आणि भगवान परशुराम मंदिर उभारण्यासाठी खा. अजित गोपछडे यांनी वीस लक्ष रुपयाचा निधी देण्याची घोषणा केली. तर आ. बालाजी कल्याणकर यांनी तीसलक्ष निधी देण्याची घोषणा केली. यावेळी सर्व नगरसेवकांनी त्याला अनुमोदन दिले. यावेळीसर्व परशुराम भक्तांनी टाळ्यांच्या कडकडाट करून परशुराम भगवंतांचा जयजयकार केला आणि सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# भारताला मिळाली पहिली डेंग्यू लस Qdenga!

## डोस कधी अन् कोणाला दिला जाईल, कसा काम करेल...

**ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाच्या (DCGI) विषय तज्ञ समितीने भारताची पहिली डेंग्यू लस क्यूडेंगाला (Qdenga) मंजुरी दिल्याने भारताचा डेंग्यूविरुद्धचा लढा अधिक मजबूत झाला आहे. ही लस लवकरच भारतातील सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होईल आणि डेंग्यूच्या रुग्णांमध्ये होणारी वार्षिक वाढ रोखण्यात प्रभावी ठरेल. दिल्लीतील श्री बालाजी ॲक्शन मेडिकल इन्स्टिट्यूटमधील इंटर्नल मेडिसिनचे संचालक डॉ. अरविंद अग्रवाल यांनी क्यूडेंगाचा डोस, परिणामकारकता आणि वेळेबद्दल माहिती दिली आहे...**






### क्यूडेंगा म्हणजे काय?

डॉ. अरविंद अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, क्यूडेंगा ही एक टेट्राव्हॅलेंट डेंग्यू लस आहे, जी डेंग्यू विषाणूच्या चारही स्ट्रेन्सपासून संरक्षण देते. हा एक महत्त्वाचा फायदा आहे, कारण एका स्ट्रेनच्या संसर्गामुळे इतर स्ट्रेन्सविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होत नाही आणि पुन्हा संसर्ग झाल्यास तो अधिक गंभीर असू शकतो. ही लस दोन डोसच्या वेळापत्रकानुसार दिली जाईल, ज्यामध्ये प्रत्येक डोसमध्ये तीन महिन्यांचे अंतर असेल. लसीकरणासाठी एक विशिष्ट वयोगट असेल (संभाव्यतः ४ ते ६० वर्षे) आणि ज्यांना पूर्वी डेंग्यू ताप आला आहे किंवा नाही, अशा कोणालाही ही लस दिली जाऊ शकते.

### उत्पादन कोण करते?

क्यूडेंगा ही लस जपानच्या टाकेडा फार्मास्युटिकल कंपनीद्वारे उत्पादित केली जाते. ही लस बाजारात आणण्यापूर्वी टाकेडाने अनेक वर्षे संशोधन आणि क्लिनिकल चाचण्या केल्या. विविध प्रदेशांतील लोकांसाठी सुरक्षित आणि प्रभावी ठरेल अशी लस विकसित करणे, हे कंपनीचे उद्दिष्ट होते. ही लस भारतात हैदराबादस्थित कंपनीद्वारे उत्पादित केली जाईल आणि तिच्या आगमनामुळे डेंग्यूचा भार कमी होण्यास मदत होईल. हे लक्षात घ्यावे की, ही लस इतर अनेक देशांमध्येही वापरली जात आहे.

### लस किती प्रभावी आहे?

क्लिनिकल चाचण्यांमध्ये क्यूडेंगाने आश्वासक परिणाम दाखवले आहेत. लसीकरणानंतर लक्षणे दिसणाऱ्या डेंग्यूचा आणि त्यानंतर रुग्णालयात दाखल होण्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. तथापि, कोणत्याही लसीची परिणामकारकता व्यक्तीचे वय, विषाणूचा पूर्वीचा संपर्क आणि प्रचलित स्ट्रेन यावर अवलंबून असते.

### संरक्षण कसे करते?

डॉ. अरविंद अग्रवाल यांच्या मते, क्यूडेंगा लस शरीराच्या रोगप्रतिकार प्रणालीला उत्तेजित करते, जेणेकरून ती डेंग्यू विषाणूच्या चारही प्रकारांना ओळखू शकेल आणि त्यांच्याशी लढू शकेल. यामध्ये विषाणूच्या कमकुवत स्वरूपाचा वापर केला जातो, जो आजार न होता रोगप्रतिकार प्रतिसाद निर्माण करतो. एकदा लस घेतल्यानंतर, शरीर विषाणूला ओळखते आणि त्याच्याविरुद्ध प्रतिपिंडे (अँटीबॉडीज) तयार करते, ज्यामुळे भविष्यात संसर्ग झाल्यास तो लगेच नष्ट होतो. ही लस संसर्ग होण्याचा धोका आणि त्याची तीव्रता लक्षणीयरीत्या कमी करते. वेगळ्या स्ट्रेनमुळे होणाऱ्या दुसऱ्या संसर्गादरम्यान डेंग्यू अधिक गंभीर होऊ शकतो, त्यामुळे क्यूडेंगा (Qdenga) सारखी टेट्राव्हॅलेंट लस अधिक मजबूत संरक्षण देण्यास मदत करते.

### डेंग्यू किती धोकादायक असू शकतो?

डॉक्टरांनी सांगितले की डेंग्यूला हलक्यात घेऊ नका; अनेक प्रकरणांमध्ये तो जीवघेणा देखील ठरू शकतो. हा आजार अनेक टप्प्यांमध्ये विकसित होतो आणि जर त्यावर त्वरित उपचार केले नाहीत तर तो धोकादायक ठरू शकतो. यामुळे डेंग्यू हेमोरेजिक फिव्हर आणि डेंग्यू शॉक सिंड्रोम यांसारखी गंभीर रूपे येऊ शकतात, ज्यामुळे प्लाझ्मा गळती, तीव्र रक्तस्त्राव, अवयव निकामी होणे आणि शॉक येऊ शकतो. प्लेटलेट्समध्ये अचानक घट झाल्यामुळे अंतर्गत रक्तस्त्राव आणि पांढरा द्रव गळती होऊ शकते. ज्यामुळे रक्तदाब लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. उपचार न केल्यास, अनेक अवयव निकामी होण्याचा आणि मृत्यूचा धोका असतो. लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला आणि ज्यांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांना या आजाराचा जास्त धोका असतो. आजाराचे लवकर निदान न करणे किंवा वैद्यकीय उपचार न घेणे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे, प्रतिबंध, लवकर निदान आणि लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात क्यूडेंगा (Qdenga) ला मिळालेली मंजुरी डेंग्यू प्रतिबंधाच्या दृष्टीने एक मैलाचा दगड ठरू शकते, कारण ते डेंग्यूच्या चारही प्रकारांपासून संरक्षण देते आणि आजाराची तीव्रता कमी करते. परंतु, हे लक्षात ठेवा की हा डेंग्यूवरील प्रतिबंध आणि खबरदारीचा पर्याय नाही; लसीकरणासोबतच तुम्हाला प्रतिबंध, जागरूकता आणि स्वच्छतेची काळजी घ्यावी लागेल.



# उन्हाळ्यात रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्याचे उपाय

## आहार, व्यायाम अन् प्रतिबंधाबद्दल डॉक्टरांनी सांगितलं...


**सध्या सूर्य आग ओकत आहे. उष्माघाताचे रुग्णही वाढत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे कमकुवत झालेली रोगप्रतिकारशक्ती. या उष्ण ऋतूत, आरोग्यदायी आहार घेणे, शरीरात पाण्याची योग्य पातळी राखणे, व्यायाम करणे आणि अस्वास्थ्यकर सवयी टाळून रोगप्रतिकारशक्ती मजबूत करता येते. खरं तर, उन्हाळ्याच्या महिन्यांत तापमान वाढते तसे डिहायड्रेशन, उष्णतेचा ताण, संसर्ग आणि पचनाच्या समस्याही वाढतात. मजबूत रोगप्रतिकारशक्तीमुळे, हवामानाशी संबंधित या आरोग्य समस्या टाळता येतात...**

### होणारे परिणाम

- अत्यधिक उष्णता
- निर्जलीकरण
- अनियमित खाण्याच्या सवयी
- दूषित अन्न किंवा पाण्याच्या संपर्कात येणे
- रोगप्रतिकारशक्तीवर हे घटक नकारात्मक परिणाम करतात, तिला कमकुवत करतात, ज्यामुळे लोकांना संसर्ग आणि आजारांचा धोका वाढतो.

### मजबूत रोगप्रतिकारशक्तीचे महत्त्व

- रोगप्रतिकारशक्ती म्हणजे काय? : रोगप्रतिकारशक्ती ही शरीराची नैसर्गिक संरक्षण यंत्रणा आहे. ती संसर्ग, विषाणू, जीवाणू आणि इतर हानिकारक रोगजंतूंपासून आरोग्याचे रक्षण करते.
- ती कशी कार्य करते : रोगप्रतिकारशक्ती ही पेशी, ऊती आणि अवयवांच्या एका जटिल जाळ्याने बनलेली असते, जे शरीरात प्रवेश करणाऱ्या किंवा वाढणाऱ्या हानिकारक पदार्थांना ओळखते आणि नष्ट करते.
- मधुमेहासारखे दीर्घकालीन आजार असलेल्यांसाठी मजबूत रोगप्रतिकारशक्ती आणखी महत्त्वाची आहे, कारण रक्तातील साखरेच्या पातळीतील चढ-उतारामुळे शरीराची संसर्गाशी लढण्याची क्षमता आणखी कमकुवत होऊ शकते.



### कमकुवत रोगप्रतिकारशक्तीमुळे उन्हाळ्यात होणाऱ्या समस्या

- पोट आणि आतड्यांचे इंफेक्शन
- अन्न विषबाधा आणि अतिसार
- अत्यधिक उष्णतेमुळे होणारा थकवा
- उष्माघात
- त्वचेचे इंफेक्शन
- फंगल इंफेक्शन
- व्हायरल इंफेक्शन- फ्लू सारखे आजार
- लक्षणे : सतत थकवा किंवा अशक्तपणा, ताप, निर्जलीकरण, पोटदुखी, डोकेदुखी आणि वारंवार होणारे इंफेक्शन.

### आहारात काय असावे?

- टरबूज, पपई, आंबा, लिंबूवर्गीय फळे आणि बेरी यांसारखी मोसमी फळे. ही जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात.
- हिरव्या पालेभाज्या; या शरीराला आवश्यक पोषक तत्वे आणि खनिजे पुरवतात.
- दही आणि प्रोबायोटिक्स आतड्यांचे आरोग्य राखतात, ज्याचा थेट परिणाम रोगप्रतिकारशक्तीवर होतो.
- काकडी, नारळाचे पाणी, ताक इत्यादींसह पुरेसे पाणी प्यायल्याने शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यास मदत होते.
- डाळी, कडधान्ये, अंडी, मासे आणि सुकामेवा यांसारखे प्रथिनयुक्त पदार्थ रोगप्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या पेशी तयार करण्यास आणि त्यांची दुरुस्ती करण्यास मदत करतात.



### आहारात काय नसावे?

- अति तेलकट किंवा मसालेदार पदार्थ
- प्रक्रिया केलेले आणि पॅक केलेले पदार्थ, विशेषतः प्रिझर्व्हेटिव्ह असलेले पदार्थ
- गोड किंवा जास्त साखर असलेली पेये आणि मिठाई
- अति कॅफीन आणि कार्बोनेटेड पेये (यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता होऊ शकते)

### व्यायाम करताना विशेष काळजी घ्या

व्यायामामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते यात शंका नाही. तथापि, उन्हाळ्याच्या हंगामात काही गोष्टींबाबत जागरूक राहणे महत्त्वाचे आहे, अन्यथा त्याचे शरीरावर सकारात्मक परिणामांऐवजी नकारात्मक परिणाम होऊ शकतात. उन्हाळ्यात दुपारच्या वेळी तापमान खूप जास्त असू शकते, म्हणून सकाळी लवकर किंवा संध्याकाळी व्यायाम करा. मध्यम तीव्रतेचे व्यायाम निवडा, जसे की जलद चालणे, योग, पोहणे आणि सायकलिंग. जर तुम्ही उच्च-तीव्रतेचे व्यायाम करत असाल, तर ते खूप उष्ण दिवसांमध्ये करणे टाळा. व्यायामापूर्वी, व्यायामादरम्यान आणि व्यायामानंतर पाणी पिऊन आपले शरीर हायड्रेटेड (पाणीदार) ठेवा.

### निरोगी राहण्यासाठी चांगल्या सवयी

पुरेशी झोप घ्या; आदर्शपणे, ७-८ तास झोप घेणे चांगले आहे. ध्यान, योग किंवा दीर्घ श्वासोच्छ्वास यांसारख्या क्रियांनी तणावाचे व्यवस्थापन करा. स्वच्छतेची चांगली काळजी घ्या, विशेषतः जेवण्यापूर्वी हात धुवा. दूषित अन्न आणि पाणी टाळा. धूम्रपान आणि मद्यपानापासून दूर राहा. नियमित आरोग्य तपासणी करा, विशेषतः ज्यांना आधीपासूनच जुनाट आजार आहेत त्यांनी. हे लक्षात ठेवा की रोगप्रतिकारशक्ती एका रात्रीत विकसित होत नाही. कोणताही ऋतू असो, आपली रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवण्यासाठी आपण निरोगी सवयी आणि निरोगी जीवनशैली जपली पाहिजे. याव्यतिरिक्त, जर तुम्हाला तुमची प्रकृती खालावत असल्याचे जाणवत असेल, तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेण्यास अजिबात संकोच करू नये.

# कसे कळेल हार्ट अ‍ॅटॅक नव्हे, दुसऱ्या कारणामुळे आहे छातीत वेदना... ‘ही’ 5 कारणे लक्षात ठेवा...

**दररोज अनेक रुग्ण छातीत दुखणे, वेदना आणि जडपणा जाणवत असल्याची तक्रार घेऊन डॉक्टरांकडे येत असतात. ही लक्षणे दिसल्यास हृदयरोग तज्ज्ञांना भेटणे योग्य आहे, परंतु घाबरून जाणे चुकीचे आहे. कारण, हृदयविकाराच्या झटक्याव्यतिरिक्त, छातीतील या समस्या पाच सामान्य कारणांमुळे देखील जाणवू शकतात. पचनसंस्था, स्नायू, फुफ्फुसे, चिंता किंवा चुकीच्या बसण्याच्या किंवा उभ्या राहण्याच्या स्थितीशी संबंधित समस्यांमुळे अनेकदा छातीत दुखते किंवा आग होते.**



### हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे

- जेव्हा तुम्ही छातीत दुखण्याची तक्रार घेऊन डॉक्टरांकडे जाता, तेव्हा ते सर्वात आधी हृदयविकाराचा झटका किंवा हृदयरोग आहे का हे तपासतात, कारण ही एक आपत्कालीन परिस्थिती असून त्यावर त्वरित उपचारांची आवश्यकता असते. हृदयविकाराच्या झटक्यामुळे छातीत दुखणे उदा. ताठरपणा, श्वास घेण्यास त्रास होणे, मळमळ, चक्कर येणे किंवा खांदे, जबडा किंवा पाठीपर्यंत वेदना पसरणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. एकदा डॉक्टरांची खात्री पटली की हा हृदयरोग नाही, तर इतर कारणांचा विचार केला जातो.
- आम्लपित्त आणि ॲसिड रिफ्लक्स : छातीत दुखण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे आम्लपित्त. या स्थितीत, पोटातील आम्ल अन्ननलिकेत वर येते, ज्यामुळे छातीत जळजळ होते. याला छातीत जळजळ (हार्टबर्न) म्हणतात. जड किंवा मसालेदार जेवणानंतर झोपल्यावर ही वेदना वाढते, हे तिचे वैशिष्ट्य आहे. ही स्थिती टाळण्यासाठी, आम्लपित्त वाढवणारे पदार्थ टाळा. एका वेळी थोडे थोडे अन्न खा आणि जेवणानंतर लगेच झोपणे टाळा. चहा, कॉफी आणि धूम्रपान कमी करा. गंभीर प्रकरणांमध्ये, अँटासिड घेतल्याने आराम मिळू शकतो. जर तुम्हाला आम्लपित्तामुळे वारंवार छातीत दुखत असेल, तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, कारण आम्लपित्तामुळे अन्ननलिकेला हळूहळू नुकसान पोहोचू शकते.
- कॉस्टोकॉन्ड्रायटिस आणि स्नायूंचा ताण : चेस्ट वॉलच्या जॉइंट आणि मसल्सवर ताण आल्यामुळेही छातीत दुखू शकते. जड वस्तू उचलणे, जोरात खोकणे, अचानक धड वळवणे किंवा चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे छातीच्या स्नायूंवर ताण येऊ शकतो. ज्यामुळे छातीच्या विशिष्ट भागात वेदना होतात. याव्यतिरिक्त, कॉस्टोकॉन्ड्रायटिसमुळे देखील समस्या उद्भवू शकतात, जी छातीच्या हाडाला बरगड्यांशी जोडणाऱ्या कूर्चेची (कार्टिलेजची) सूज आहे. खोकल्याने, शरीराच्या हालचालीने किंवा दाबामुळे वेदना वाढते. या स्थितीपासून आराम मिळवण्यासाठी, जास्त श्रमाची कामे टाळा, गरम शेक द्या, शरीराची स्थिती सुधारा आणि वेदनाशामक औषधे घ्या. हलके स्ट्रेचिंग आणि फिजिओथेरपीमुळे त्वरित आराम मिळू शकतो.
- चिंता, तणाव आणि पॅनिक अटॅक : भावनिक तणाव आणि चिंतेमुळे छातीत तीव्र वेदना होऊ शकतात. यामध्ये छातीत जडपणा, हृदयाचे ठोके वाढणे, धाप लागणे, घाम येणे आणि अज्ञात धोक्याची भावना यांचा समावेश असू शकतो. ही लक्षणे हृदयविकाराच्या झटक्यासारखी दिसू शकतात, त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. हृदयविकार नसल्याची खात्री झाल्यावर, तणाव आणि चिंता व्यवस्थापनाच्या पद्धती अवलंबल्या जातात. श्वासोच्छ्वासाचे व्यायाम, पुरेशी झोप घेणे, कॅफीनचे सेवन कमी करणे आणि व्यावसायिक मानसिक आरोग्य सहाय्य घेणे यामुळे बहुतेक रुग्णांना आराम मिळतो.
- फुफ्फुसांचे आजार : फुफ्फुसे आणि त्यांच्या आवरणाशी संबंधित समस्यांमुळे देखील छातीत जडपणा, वेदना किंवा टोचल्यासारखे वाटू शकते. छातीचा संसर्ग, न्यूमोनिया किंवा तीव्र खोकला ही सामान्य कारणे आहेत. कधीकधी, दम्यामुळे देखील छातीतील जडपणा वाढू शकतो. आराम मिळवण्यासाठी मूळ आजारावर उपचार करणे आवश्यक आहे. संसर्ग झाल्यास, प्रतिजैविके (अँटिबायोटिक्स) किंवा आधारभूत उपचार दिले जातात. दम्यामुळे होणारा छातीतील घट्टपणा इनहेलर किंवा श्वसनोपचारांनी कमी करता येतो. छातीत दुखण्यासोबत ताप किंवा सतत खोकला असल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- पोट फुगणे आणि अपचन : बऱ्याच लोकांना गॅस, पोट फुगणे आणि अपचनामुळे छातीत दुखण्याचा अनुभव येतो. कारण जेव्हा गॅसमुळे पोट फुगते, तेव्हा पोटाच्या वरच्या भागात किंवा छातीच्या खालच्या भागात अस्वस्थता जाणवते. ही स्थिती अनेकदा हृदयाच्या ऊतींमधील समस्येशी संबंधित असते. या वेदनेसोबत ढेकर येणे, पोटात जडपणा किंवा अस्वस्थता जाणवणे अशी लक्षणे दिसतात. यापासून आराम मिळवण्यासाठी, हळू हळू जेवा, अति खाणे टाळा, गॅस निर्माण करणारे पदार्थ मर्यादित प्रमाणात खा आणि जेवणानंतर शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहा. हलके अन्न, कोमट पाणी आणि गॅसची औषधे आराम देऊ शकतात.

# ‘विकसित महाराष्ट्र २०४७’साठी ठोस कृती आराखडा; प्रादेशिक तफावत कमी करण्यावर सरकारचा भर

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील प्रादेशिक तफावत कमी करून सर्व जिल्ह्यांचा समतोल आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रत्येक विभागाने निश्चित कालमर्यादेत ठोस कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

‘विकसित महाराष्ट्र २०४७’ या व्हिजन मॅनेजमेंट नियामक मंडळाच्या आढावा बैठकीत त्यांनी विविध विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेतला आणि पुढील टप्प्यात प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्याचे स्पष्ट केले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, वित्त राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल (ऑनलाइन), तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की,



महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असले तरी ११ जिल्हे अजूनही मागे आहेत. या जिल्ह्यांना ‘विकासाचे इंजिन’ मानून त्यांचा वेगाने विकास केल्यास राज्याच्या एकूण प्रगतीला चालना मिळेल. केंद्राच्या आकांक्षी जिल्ह्यांच्या धर्तीवर राज्यात १० आकांक्षी जिल्हे आणि १७४ आकांक्षी तालुके निश्चित करण्यात आले असून, स्थानिक पातळीवर विकासाचे मापदंड उंचावण्याचा प्रयत्न सुरू आहे.

शाश्वत विकास उद्दिष्टांच्या निर्देशांकात महाराष्ट्राला पुन्हा आघाडीवर आणण्यासाठी विभागनिहाय कृती आराखडे तयार करण्यावर त्यांनी भर दिला. नियोजन विभागाने तत्काळ मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, तर वित्त विभागाने ३० एप्रिलपर्यंत प्रकल्पांचे आर्थिक मूल्यमापन पूर्ण करावे, असेही त्यांनी सांगितले. निधी उभारणीसाठी केंद्र-राज्य योजना, जिल्हा योजना, वित्त आयोग अनुदान आणि कर्ज पर्यायांचा योग्य समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले. ‘इज ऑफ डुईंग बिझनेस’ सुधारण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि जमीन मूल्य धोरणांचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला. केंद्राकडील निधी मिळवण्यासाठी उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच खाजगी गुंतवणूक, निर्यात आणि उपभोग वाढवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

# अटल सेतू ते पुणे द्रुतगती जोडमार्ग फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख शहरांमधील प्रवासाचे अंतर अवघ्या काही मिनिटांवर आणणाऱ्या ’अटल सेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग’ या जोडप्रकल्पाने (कनेक्टर) महत्त्वाचे अभियांत्रिकी टप्पे ओलांडले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) या कामाला विशेष गती दिली असून, आतापर्यंत १४३ ठिकाणी पाया उभारणी (फाऊंडेशन) पूर्ण झाली आहे. या प्रकल्पामुळे ’मुंबई ३.०’ च्या संकल्पनेला बळ मिळणार असून नवी मुंबई विमानतळ आणि पुण्याकडे जाणारा प्रवास सिग्नलविरहित होणार आहे.

७.३५ किमी लांबीच्या या सहा मार्गिकांच्या पुलाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. एकूण १७६ पायाभूत ठिकाणांपैकी १४३ ठिकाणचे काम पूर्ण झाले असून, १४१ ठिकाणी पियर्स (खांब) उभे राहिले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ८३० प्रीकास्ट गर्डर्सपैकी ६५३ गर्डर्सची उभारणी पूर्ण झाली आहे. पळस्पे परिसरात द्रुतगती मार्गाला जोडण्यासाठी स्लिप रोड्स आणि सर्व्हिस रोड्सच्या रुंदीकरणाचे कामही समांतरपणे सुरू आहे, ज्यामुळे वाहतूक कोंडीविना प्रवाशांना महामार्गावर प्रवेश मिळेल.

हा कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर अटल सेतूमार्गे (शिवडी-न्हावा शेवा) चिर्ले आणि पळस्पेवरून थेट पुण्याकडे जाता येईल. यामुळे प्रवासाच्या वेळेत मोठी बचत होणार असून लॉजिस्टिक्स क्षेत्रालाही गती मिळणार आहे. विशेष म्हणजे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालाही या मार्गामुळे सुलभ प्रवेश मिळणार



असल्याने हा मार्ग भविष्यात मुंबई आणि पुण्याच्या आर्थिक प्रगतीचा कणा ठरणार आहे.

अटल सेतूमार्गे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आता सिग्नलविरहित प्रवास शक्य होईल. यामुळे नोकरदार आणि विद्यार्थ्यांचा दैनंदिन प्रवास सुलभ होईल. ’मुंबई ३.०’ घडवताना तासांचा प्रवास मिनिटांत आणण्याचे आमचे ‘मुंबई इन मिनिट्स’ हे उद्दिष्ट या प्रकल्पाद्वारे पूर्ण होत आहे. फेब्रुवारी २०२७ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे उद्दिष्ट आहे. हा मार्ग नव्या विकासकेंद्रांना जोडणारा दुवा ठरेल. यामुळे मुख्य मुंबईवरील ताण कमी होऊन नवी मुंबई आणि आसपासच्या भागात औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल. समुद्री पूल, द्रुतगती मार्ग आणि मेट्रो नेटवर्कचे एकात्मिक जाळे विणण्याच्या एमएमआरडीएच्या योजनेतील हा एक महत्त्वाचा दुवा आहे.

## भाजपा युवा मोर्चाची युवा शक्ती जागर यात्रा

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील युवावर्गासह शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या युवक - युवतींशी संवाद साधण्यासाठी २१ एप्रिलपासून राज्यव्यापी युवा शक्ती जागर यात्रेचा प्रारंभ होत असल्याचे भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी घोषित केले. या यात्रेच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच राज्य सरकारमधील मंत्री उपस्थित राहणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. भाजपा प्रदेश कार्यालयात सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत महाडिक बोलत होते. भाजपा प्रदेश माध्यम प्रमुख गोविंद येतयेकर, सहमाध्यम प्रमुख ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३० जूनच्या आधी कर्जमाफी मिळणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – आगामी खरीप हंगामावर ‘एल निनो’चे सावट असून यंदा राज्यात दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्केच पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर यंदा १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात घोषित केलेली ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना’ ३० जूनच्या आत राबवली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पुण्यातील शिवाजीनगर भागात नव्याने बांधण्यात आलेल्या ‘सारथी’च्या सभागृहात खरीप हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीसाठी राज्यस्तरीय



कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत भरणे बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यंदा खरिपासाठी २०.१७ लाख क्विंटल बियाण्यांची गरज असून, २८.०५ लाख क्विंटल साठा उपलब्ध आहे. खतांच्या बाबतीतही राज्य सुरक्षित असून, ४८.८० लाख मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले आहे. सद्यस्थितीत २५.१७ लाख मेट्रिक टन खत उपलब्ध असून, टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.

कमी पावसाच्या अंदाजामुळे कृषी विभागाने हवामान प्रतिरोधक बियाण्यांचा वापर, उताराला आडवी पेरणी आणि ‘बीबीएफ’ तंत्रावर भर देण्याचे ठरवले आहे. शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्यासाठी ‘महाकृषी’ आणि ‘महाविस्तार’ पसह सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. तसेच नुकसानग्रस्त १३६ लाख शेतकऱ्यांसाठी २० हजार १९६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, अलीकडील अवकाळी पावसाचे पंचनामेही युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## मणिपूरमध्ये ५.२ रिश्टर तीव्रतेचा भूकंप

मणिपूर (वृत्तसंस्था) - मणिपुरच्या अनेक भागांमध्ये आज म्हणजेच मंगळवार २१ एप्रिल रोजी पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.२ इतकी नोंदवण्यात आली असून, त्याचे केंद्र कामजोंग जिल्ह्यात होते.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीच्या माहितीनुसार, हा भूकंप सकाळी ५.५९ वाजता झाला. धक्के जाणवताच कामजोंग आणि आसपासच्या भागातील नागरिकांमध्ये घबराट पसरली आणि अनेकजण घाबरून घराबाहेर पडले. भूकंपाचे केंद्र अक्षांश २४.७०३ उत्तर आणि रेखांश ९४.४१५ पूर्व येथे, सुमारे ६२ किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगण्यात आले.

## जाहीर प्रगटन

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाद्वारे आमचे अशील यांच्या सांगण्यावरून व सूचनेवरून खालीलप्रमाणे सूचित करण्यात येते की,

१. मालमत्तेचे वर्णन: नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीतील, सर्वे क्र. १४१/१ व सीटीएस क्र. १८८९३ पैकी लक्ष्मी नगर-मधील प्लॉट क्र. १ असून ज्याचा मनपा क्र. १-२१-१६६२/१ आहे, ज्याची एकूण लांबी पूर्व-पश्चिम उत्तरेकडील बाजू १०४ फुट व दक्षिणेकडील बाजू १०२ फुट व रुंदी उत्तर दक्षिण पूर्वेकडील बाजू ३२.६ फुट व पश्चिमेकडील बाजू ३२ फुट आहे. तर एकूण क्षेत्रफळ ३३०८.८७ चौ. फुट आहे, त्यातील अंतर्गत व बाह्य हक्कांसह सदर मालमत्तेची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे:

पूर्वेस : प्लॉट क्र. १६ आहे. पश्चिमेस : ८० फुट रुंद रोड आहे. दक्षिणेस : सर्वे क्र. १४१ आहे, उत्तरेस : प्लॉट क्र. ०२ आहे.

२. मालकी हक्काचा तपशील: सदर मालमत्तेचे विद्यमान मालक शेख महेमूद गुलाम नबी रा. महेबूब नगर नांदेड ता. जि. नांदेड व अब्दुल मुजीब अब्दुल मगदूम यांचे विशेष कुलमुखत्यार आम पत्रधारक महम्मद वसीम शेख मोईन रा. गुलजार बाग नांदेड हे असून. ३. व्यवहाराचा तपशील: आमच्या अशीलांनी वरील मालमत्ता विशेष कुलमुखत्यार आम पत्रधारक महम्मद वसीम शेख मोईन यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून, त्याबाबत ‘सौदाचिठ्ठी’ करार निष्पादित केला आहे. सदर व्यवहारापोटी आमच्या अशीलांनी इसारा रक्कम मालकास अदा केली आहे. ४. सदर मालमत्ता ही सर्व प्रकारे निर्वेध, निर्जोखीम व बोजाविरहित आहे असे मालकाने आमच्या अशीलांना खात्रीपूर्वक सांगितले आहे. तरीही वरील मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लोन, जप्ती, वारसा हक्क, पोटगी, एखादा इसार पावती करार, न्यायालयीन स्थगिती किंवा अन्य कोणताही बोजा अथवा तक्रार असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रांच्या पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. जर मुदतीत कोणाचीही कायदेशीर हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर मालमत्ता पूर्णतः निर्वेध व निर्जोखीम आहे असे समजून आमचे अशील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

मार्फत
**ॲड. श्रीकांत ए. नेवरकर**
गोदावरी नगर, जैन मंदिर, तरोडा खु. नांदेड
मो. ९८६०२०६१४४, ७५८८४३०८३८

# देशात आता अल्कोहोलवर चालणार कार?

**नवीदिल्ली (वृत्तसंस्था)** – भारत सरकार आता देशात ८५% अल्कोहोल (इथेनॉल) असलेल्या इंधनावर गाड्या चालवण्याची मोठी तयारी करत आहे. या क्रांतीला नाव देण्यात आलंय एट५ किंवा फ्लेक्स फ्यूल.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण एक गोष्ट सतत तपासतो, ती म्हणजे पेट्रोल-डिझेलचे भाव. आंतरराष्ट्रीय बाजारात युद्धाची ठिणगी पडली की त्याचे थेट चटके आपल्या खिशाला बसतात. सध्या अमेरिका आणि इराणमधील तणावामुळे स्ट्रेट ऑफ हॉर्मुजमध्ये तेलाची जहाजे अडकली आहेत आणि जगात इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याची भीती आहे. अशा परिस्थितीत, जर आपली गाडी पेट्रोलऐवजी शेतात पिकणाऱ्या पिकांपासून तयार झालेल्या इंधनावर धावली तर? हा विचार आता प्रत्यक्षात येणार आहे.

आतापर्यंत आपण एट२० इंधनाबद्दल ऐकलं होतं, ज्यात २०% इथेनॉल असतं. पण आता सरकार थेट एट८५ कडे वळतंय. सोप्या भाषेत सांगायचं तर, तुम्ही टाकलेल्या इंधनात ८५% इथेनॉल असेल आणि फक्त १५% पेट्रोल असेल.

हे इथेनॉल प्रामुख्याने आपल्या देशातील ऊस, गहू आणि इतर धान्यांपासून तयार केले जाते. म्हणजेच, पेट्रोलसाठी आखाती देशांवर अवलंबून राहण्यापेक्षा आपण आपल्याच शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालावर गाड्या चालवू शकू.

तुमच्या सध्याच्या गाडीत हे इंधन चालेल का? हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे उत्तर नाही असं आहे. एट८५ हे इंधन वापरण्यासाठी गाड्यांच्या इंजिनमध्ये काही खास बदल करावे लागतील. या इंधनासाठी खास फ्लेक्स फ्यूल व्हेइकल्स तयार केली जातील. जर तुम्ही साध्या गाडीत एट८५ इंधन टाकलं, तर इंजिनला गंज लागू शकतो, इंजिनमधील सील आणि पाईप्स खराब होऊ शकतात. तसेच गाडी स्टार्ट होण्यासही मोठी अडचण येऊ शकते.

सरकारचा मास्टर प्लॅन काय आहे? सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एट८५ साठीच्या नियमांचा मसुदा तयार असून तो लवकरच जाहीर केला जाईल. या इंधनाचे प्राथमिक परीक्षणही सुरू झाले आहे. देशातील सर्व राज्यांमध्ये एट२० पेट्रोलची विक्री अनिवार्य करण्यात आली आहेच, पण आता एट८५ ला एक वेगळा फ्यूल ग्रेड म्हणून बाजारात उतरवले जाईल.

## व्यापार करारासाठी भारतीय शिष्टमंडळ वॉशिंग्टनला भेट देणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भातील प्रयत्न आता अंतिम आणि सर्वात महत्त्वाच्या टप्प्यात पोहोचले आहेत. या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी भारतीय प्रतिनिधीमंडळ या आठवड्यात वॉशिंग्टनला पोहोचत आहे. अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबाबत माहिती दिली आहे.

सर्जिओ गोर यांनी एका ट्विटद्वारे अधिकृत पुष्टी करत सांगितले की, भारतीय व्यापार प्रतिनिधीमंडळ या आठवड्यात वॉशिंग्टनला पोहोचत आहे. या महत्त्वाच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश द्विपक्षीय व्यापार कराराला अंतिम स्वरूप देणे हा आहे.


## Change In Name

**My old Name is SHAHEDA PARVEEN PATHAN which now I am Changing as New Name SHAHEDA PARVEEN JAVED KHAN PATHAN Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same, Sign by SHAHEDA PARVEEN JAVED KHAN PATHAN Address: H.No.321 Station Road Near Naushad Function Hall Dargah Mohalla Balaji Nagar Dharmabad Dist Nanded-431809 Mo. 9923871645**

## Change In Name

**My old name KOLI NAGENDRA MAROTI which how I am changing as new name KOLI NAGENDRA MAROTIRAO Hence forth My all correspondence will be done as per my name please consider the same.**

**Address - At. Post. SHIVAJI NAGAR Tq. Nanded, Dist. Nanded-431602**
**Mo. No. 9834575220**

## Change In Name

**My old name BEEBEE BEGUM which how I am changing as new name DAULAT BI MOHAMMED IBRAHIM Hence forth My all correspondence will be done as per my name please consider the same.**

**Sign by - DAULAT BI MOHAMMED IBRAHIM H. NO 1-4-135, NAI ABADI SHIVAJI NAGAR OPP POLICE STATION NANDED.**


## निदा खान ‘टीसीएस’मधून निलंबित

**नाशिक (प्रतिनिधी)** – कॉर्पोरेट जिहाद प्रकरणी संशयित आरोपी निदा खानला टीसीएसने सेवेतून निलंबित केले आहे. पोलीस निदाला शोधत आहे. निदाच्या घरच्यांकडे तिचा ठावठिकाणा जाणून घेण्यासाठी चौकशी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर निदाने नाशिक सत्र न्यायालयात (नाशिक सेशन्स कोर्ट) अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. निदाच्या अर्जावर सत्र न्यायालयात सोमवारी २० एप्रिल रोजी सुनावणी झाली पण निर्णय झाला नाही. पुढील सुनावणी २७ एप्रिलच्या सोमवारी होणार आहे.

न्यायालयात सुनावणी प्रलंबित असली तरी टीसीएसने निदा खानला सेवेतून निलंबित केले आहे आणि तिचे कंपनीशी संबंधित सर्व ॲक्सेस काढून घेतले आहेत. पोलिसांनी निदाचा शोध सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

सोमवारी २० एप्रिल रोजी झालेल्या सुनावणी निदाच्या वकिलाने आणि सरकारी वकिलाने आपापली बाजू मांडली तसेच युक्तिवादाचे आणखी मुद्दे मांडण्यासाठी वेळ मागितला. न्यायालयाने पुढील सुनावणी २७ एप्रिलच्या सोमवारी ठेवली आहे.

निदा खान टीसीएसमध्ये प्रोसेस असोसिएट पदावर कार्यरत होती, तिला निलंबित करताना कंपनीने टीसीएसशी संबंधित असलेले तिचे सर्व ॲक्सेस काढून घेतले आहेत. कंपनीशी संबंधित ज्या वस्तू निदाकडे आहेत त्या सर्व तिच्याकडून परत मागण्यात आल्या आहेत. तसेच तिला पुढील आदेशापर्यंत कंपनीसाठी काम करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.


## Change In Name

My Old Name is **BALAJI SAMBHAJI INGLE** which now I am changing as New Name **BALAJI SAMBHAJIRAO INGLE.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Address - BALAJI SAMBHAJIRAO INGLE At. Post KHANAPUR, TQ. Degloor, Dist. NANDED-431717**
**Mo.No. 9422173489**

## Change In Name

My Old Name is **GAIKWAD PRIYA DAMODAR** which now I am changing as New Name **PRIYA DAMODARRAO GAIKWAD.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Address - PRIYA DAMODARRAO GAIKWAD At. Post KHANAPUR, TQ. Degloor, Dist. NANDED-431717**
**Mo.No. 9850809696**

## एमएमसीचे प्रमाणपत्र हरवले

माझे डॉ. सुरज गणेशराव पाटील या नावाचे MMC,(Maharashtra medical council) permanent registration certificate हे प्रमाणपत्र दिनांक १७ एप्रिल २०२६रोजी हिंगोली गेट ते भाग्यनगर ऑटो प्रवासामध्ये हरवली आहे. तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती. **संपर्क पत्ता**–डॉ. सुरज गणेशराव पाटील शिवाजी सदन, शास्त्रीनगर, नांदेड.

## एमएमसीचे प्रमाणपत्र हरवले

माझे डॉ. शरद रमेशराव सावळे या नावाचे MMC, (Maharashtra medical council) permanent registration certificate हे प्रमाणपत्र दि. १७ एप्रिल २०२६ रोजी हिंगोली गेट ते भाग्यनगर दरम्यान ऑटो प्रवासामध्ये हरवले आहे. तरी कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती. **संपर्क पत्ता**– डॉ. शरद रमेशराव सावळे, शिवाजी सदन, शास्त्रीनगर, नांदेड.

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice

The Superintending Engineer, MSEDCL Hingoli Circle Hingoli on behalf of MSEDCL (The Employer) invites sealed e-tenders from reputed and e-registered agencies/ bidders. The details are as given below.

| Sr. No. | Tender No. | Particulars of work | Tender Estimate Cost Rs in Lakhs | Tender Purchasing cost with GST | EMD in Rupees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/HNG/ET-03/26-27 | Tender for Providing of 33kV & 11kV Various type of CTs /PTs as per MSEDCL Specifications under Hingoli Circle | Rs.20.00 Lacs | 2950/- | Rs. 20000/- |

The tenders will be processed only in electronic tendering mode and opened for registered agencies on e-Tendering system for works contract of MSEDCL. The Bid documents will be available from 22.04.2026 to 27.04.2026 up to 13.00 PM. The last date of uploading of e-Tendering is 27.04.2026 upto 14.00 PM. For more details regarding registration process and tender visit our Company's e-Tendering website https://www.mahadiscom.in. The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof. Contact Details : S.J.Mungare, Ex.Engr.(Admn) Contact No.: + 91 7875460586.

Sd/-
**PR No. 15/2026-27 Dt. 17.04.2026** **Superintending Engineer, MSEDCL Hingoli Circle.**

**VEHICLE FOR SALE**

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech no | Year | Model |
|---|---|---|
| ENG NO:-532826474122 | 2023 | TRACTOR EICHER ( TAFE) 551 PRIMA |
| CHASSIS NO:-932814586880 | | |

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before **24/04/2026** Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar complex, Bafna T- Point , Nanded 431601
PH-9987006249,8806082926

## टी.सी. हरवली

माजी अनिल बबनराव डफडे या नावाची इयत्ता नववी पासची टी. सी. धनेगाव ते सिडको ऑटोरिक्षा प्रवासात हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास संपर्क साधावा. **संपर्क पत्ता** –अनिल बबनराव डफडे घर क्रमांक २४ माधव निवास, कौशल्या नगर धनेगाव ता.जि.नांदेड
मो. ८४४६४६१६०६

## टी.सी. हरवली

माझी प्रविण पिराजी चंदणे या नावाची इयत्ता चौथी पास ची टीसी किनवट ते भोकर बस प्रवासात गहाळ झाली असून कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.
- संपर्क -
प्रविण पिराजी चंदणे
रा. भिसी ता. किनवट जी. नांदेड मो.९९२११२१५१४


## Change In Name

My Old Name is **Shobha Sayamsunder Kalyankar** which now I am changing as New Name **Rekha Sayamsunder Kalyankar.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Sign By - Rekha Sayamsunder Kalyankar**
**Address - Plot No. 9, Behind Soubhadra Mangal Karyalaya, Sambhaji Nagar, Taroda Bk. Air Port Road, Nanded-5**
**Mo.No. 7875044466**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# तिहेरी खून प्रकरणातील फरार आरोपी शाहरुख उर्फ कबुतरसह दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, मुख्य आरोपी लवकरच अटक करू; एसपी अबिनाश कुमार यांचा विश्वास

**नांदेड (प्रतिनिधी)-** भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ई-स्क्वेअर ते डी मार्ट रस्त्यावर दि. ४ एप्रिल रोजी ट्रिपल मर्डरच्या थराराने शहरात खळबळ उडाली होती. या थरार घटनेत अर्जितसिंग चव्हाण, अरबाज आणि आवेज या तिघांची हत्या करण्यात आली होती. हत्येनंतर यातील सराईत गुन्हेगार असलेला शाहरुख उर्फ कबुतर आणि त्याचा साथीदार या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या टीमने तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथून शिताफीने अटक केली. या दोन्ही आरोपींना भाग्यनगर पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने पोलीस कोठडीत पाठवले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेला साईलाला यालाही लवकरच अटक करू, असा विश्वास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी बोलून दाखवला.



दि. ४ एप्रिल २०२६ रोजी रात्री अंदाजे १.१० ते १.३० वाजताच्या दरम्यान भाग्यनगर ठाण्याच्या हद्दीत कॅनाल रोडवर ई स्केअरजवळ प्रफुल्ल ऊर्फ अजितसिंग गजानन चव्हाण त्याच्या मित्रांसोबत ई स्केअर येथून धुरंदर हा चित्रपट पाहून कॅनाल रोडने त्याच्या बुलेटवरून घरी जात असताना आरोपी साईलाला, शाहरुख उर्फ कबुतर, सोनू राऊत, आवेज सय्यद, महम्मद अरबाज, उबेद व साहेर यांनी जुण्या भांडणाच्या कारणावरून प्रफुल्ल चव्हाण याच्या अंगावर चाकू व तलवारीने वार करुन दहशत निर्माण केली होती. त्यावरुन पोलीस स्टेशन भाग्यनगर यांनी सदर गुन्ह्यातील सोनू राऊत, साहेर यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली होती.

त्यानंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने दि. ६ ते दि. १३ एप्रिल २०२६ पर्यंत तसेच दि. १६ एप्रिल व दि.१९ एप्रिल २०२६ रोजी नांदेड शहरामध्ये सराईत गुन्हेगारांची तपासणी करुन कारवाई करण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. त्यादरम्यान नांदेड शहरात मपोका कलम ५५ प्रमाणे १३ व मपोका ५६/५७ प्रमाणे ३० हद्दपार करण्यात आलेल्या इसमांची तपासणी करण्यात आली असता ८ इसम नांदेड शहरात मिळून आल्याने त्यांच्या विरुध्द मपोका कलम १४२ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मनपा अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे प्रमुख रस्ते व फुटपाथ मोकळे

**नांदेड (प्रतिनिधी)-** महापालिकेची अतिक्रमण हटाव मोहीम पुन्हा एकदा सुरु झाली आहे. अतिक्रमण हटाव पथकाने शहरातील शिवाजीनगर, फुले मार्केट, आयटीआय चौक, महाराणा प्रताप चौक यांसह प्रमुख रस्ते व फुटपाथवरील अतिक्रमण काढले आहे. त्यामुळे फुटपाथ मोकळे झाले असून, संपूर्ण रस्ते अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त झाल्याचे दिसून येत होते.



वाहतूक कोंडी ही नांदेड शहराची दररोजची डोकेदुखी झाली आहे. फुटपाथ व रस्त्यावर होणारे अतिक्रमण हे वाहतूक कोंडी होण्यास कारणीभूत ठरत होते. याची दखल घेऊन शहरातील आयटीआय चौक, शिवाजीनगर, फुले मार्केट तसेच महाराणा प्रताप चौक व इतर भागातही अतिक्रमण मोहीम राबविण्यात आली. महापालिकेचे उपायुक्त अजितपालसिंग संधू व दत्तात्रय कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील उपरोक्त प्रमुख रस्ते व फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. उत्तर व दक्षिण पथकाने रस्त्यावरील फळझाडे अतिक्रमित टपऱ्या तसेच फुटपाथवरील मोठ्या व्यावसायिकांनी केलेले अतिक्रमण सोईंग मशीनद्वारे काढले. शिवाजीनगर, फुले मार्केट, आयटीआय चौकातील फुटपाथ तसेच रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यात आले. यावेळी पथकाने अतिक्रमित साहित्य जप्त केले.

महाराणा प्रताप चौकात सूचना देऊनही व्यावसायिकांनी अतिक्रमण केले होते. परिणामी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. येथेही अतिक्रमण हटाव मोहीम राबवून तेथील अतिक्रमण काढण्यात आले. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्ते व फुटपाथ आता मोकळा श्वास घेऊ लागले आहेत. परंतु या अतिक्रमण हटाव मोहिमेच्या मार्गदर्शकांना रस्त्याच्या कडेला असलेल्या धनदांडग्यांच्या चारचाकी दिसल्या नसाव्यात, याबाबत काय उपाययोजना करणार? त्यामुळे वाहतूक कोंडीवर परिणाम होत नाही का? असा सवाल सुज्ञ नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# जिल्हा पोलीस दलातील १६ अंमलदारांच्या खांद्यावर दोन स्टार

**नांदेड (प्रतिनिधी) -**जिल्हा पोलीस दलातील १६ पोलीस अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक पदाची पदोन्नती मिळाल्यानंतर ते नांदेड पोलीस परिक्षेत्रात हजर झाले. त्यानंतर त्या सर्वांना परिक्षेत्रातून नांदेड जिल्हा पोलीस दलात पाठविण्यात आले. पोलीस अधीक्षक कार्यालयातील प्रभारी कार्यालय अधीक्षक सी. पी. कपाळे यांच्या स्वाक्षरीने या १६ पोलीस उपनिरीक्षकांना नवीन नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

जिल्हा पोलीस दलातील १६ पोलीस अंमलदार दि. १६ एप्रिल २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक ही पदोन्नती घेऊन पोलीस महासंचालकांच्या आदेशानुसार पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय नांदेड परिक्षेत्र येथे हजर झाले. दि. १७ एप्रिल रोजी त्यांना



नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर करून घेण्यात आले. त्यांना देण्यात आलेली नियुक्ती पुढीलप्रमाणे- पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय गिरी- कुंडलवाडी, नारायणसिंह रघुवंशी- उमरी, उत्तम सकनुरे- देगलूर, अनिल मानेकर- इतवारा, विश्वनाथ वसमते- विमानतळ सुरक्षा (नियंत्रण कक्ष), व्यंकट शिंदे- बारड, मोहम्मद गौस जिलानी- स्ट्रिट सेफ्टी पथक, संतोष तिडके- शहर वाहतूक शाखा वजिराबाद, साहेबराव आडे-इतवारा, विठ्ठल खोमणे- जिल्हा विशेष शाखा, विश्वंभर निकम-कुंटूर, बालासाहेब पांपटवार-सोनखेड, शेख रसूल महेबुब साब- तामसा, विठ्ठल गवळी- इतवारा, हनुमंत तुपकर- नियंत्रण कक्ष, महम्मद जाकेर शेख कासीम- वाचक इतवारा उपविभाग.

# वंदे भारत एक्स्प्रेसच्या वेळापत्रकात बदल

**नांदेड (प्रतिनिधी)-** गाडी क्र. २०७०५/२०७०६ हजूर साहिब नांदेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई, हजूर साहिब नांदेड वंदे भारत एक्स्प्रेसच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. तसेच हिंगोली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई जनशताब्दी एक्स्प्रेसच्या वेळेतही बदल करण्यात आला आहे.

रेल्वे बोर्डाने गाडी क्र. २०७०५/२०७०६ हजूर साहिब नांदेड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-हजूर साहिब नांदेड वंदे भारत एक्स्प्रेसच्या धावण्याचा



वेळ ३० मिनिटांनी कमी करून वेगवाढ व वेळापत्रकात सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.

सदर सुधारित वेळापत्रक दिनांक ३ मे २०२६ पासून लागू होणार असून, गाडीसंख्या २०७०५ हुजूर साहिब नांदेड, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ३ मे २०२६ रोजी सकाळी ५.२० निघणार आहे. ती गाडी रात्री १०.२५ ला पोहचेल.

तर गाडी क्र. २०७०५/२०७०६ हजूर साहिब नांदेड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - हजूर साहिब नांदेड वंदे भारत एक्स्प्रेसच्या वेळापत्रकात करण्यात आलेल्या बदलानुसार खालील गाड्यांच्या वेळापत्रकात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे: गाडीसंख्या १७६८८ धर्माबाद -मनमाड मराठवाडा एक्स्प्रेस मनमाड : १३.२५ सुटणारी मनमाड : १३.४० ला पोहचेल. ही गाडी दि. ३ मे रोजी सुटणार आहे.

गाडीसंख्या १२०७२ हिंगोली -मुंबई जनशताब्दी ही गाडी हिंगोली : ०४.२०, बसमत : ०४.५९/०५.००, पूर्णा : ०५.३०/०५.३५, परभणी : ०६.१३/०६.१५, सेलू : ०६.५९/०७.००, परतूर : ०७.२९/०७.३०, जालना : ०८.२८/०८.३०, हिंगोली :०४.१५, बसमत : ०४.५४/०४.५५, पूर्णा :०५.२५/०५.३०, परभणी: ०६.०८/०६.१०, सेलू :०६.५४/०६.५५, परतूर :०७.२४/०७.२५, जालना : ०८.२३/०८.२५ पोहचेल.

# डॉ. शिवाजी लाड यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) -**शहरातील नामांकित पशु चिकित्सक डॉ. शिवाजीराव वसंतराव लाड यांचे मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी रात्री ८ च्या दरम्यान गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. ग्राहक पंचायतचे राज्य अध्यक्ष तथा दासबोध सखोल अभ्यास फाऊंडेशनचे संचालक डॉ. विजय लाड यांचे ते धाकटे बंधू होत.

# राधाबाई वाघमारे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)-** बिलोली तालुक्यातील पाचपिंपळी येथील रहिवासी राधाबाई पिराजी वाघमारे हल्ली मुक्काम शिवराय नगर नांदेड यांचे दि. २१ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शिवरायनगरातील संविधान निवास येथून निघून गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे. त्या प्राचार्या प्रा. डॉ. कविता सोनकांबळे यांच्या मातोश्री होत.

# गुरुद्वारा भागातून १७ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी) -**नांदेड शहरातील गुरुद्वारा परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने २१ एप्रिल २०२६ रोजी नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकली. या धाडीत एकूण १७ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करून ८३०० रुपये दंड वसूल केला.

सदर कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशाने



जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ. संजीवनी जाधव, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, केस रजिस्ट्री सहायक सुनील तोटेवाड व एमजीबीएसचे मंगेश गायकवाड तसेच वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर पांचाळ उपस्थित होते.

# पत्नीच्या अनैतिक संबंधास कंटाळून पतीची आत्महत्या

## रावणगाव (म) येथील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)-** पत्नीच्या अनैतिक संबंधास कंटाळून एका पस्तीस वर्षीय पतीने आपल्या राहत्या घरी विष प्राशन करून आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या बंडू कराळेविरुद्ध मनाठा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हदगाव तालुक्यातील रावणगाव (म) येथील राहणारा दत्ता हिरामण राठोड (वय ३५) याच्या पत्नीचे त्याच गावातील बंडू उर्फ रुखाजी कराळे याच्यासोबत अनैतिक संबंध होते. त्याने अनेक वेळा पत्नी व बंडू कराळे याला समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. अखेर पत्नीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून १९ एप्रिल रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास विष पिऊन आत्महत्या केली. बंडू उर्फ रुखाजी दगडू कराळे याने त्यास आत्महत्येस प्रवृत्त केल्यावरून विजय हिरामण राठोड यांनी मनाठा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीकर देशमुख कहाळेकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)-** नायगाव तालुक्यातील कहाळ्याचे मूळ रहिवासी, शहरातील बजाजनगर भागात वास्तव्यास असणारे नायगाव तालुक्याचे भाजपाचे माजी अध्यक्ष श्रीकर उर्फ त्र्यंबक रमाकांतराव देशमुख कहाळेकर यांचे मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ५३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, वहिनी, पुतणे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी ९.३० वाजता गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# जनगणना पूर्ण होईपर्यंत एससी जाती उपवर्गीकरण प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)-** राज्य शासनाने अनुसूचित जातीतील ५९ जातींचे उपवर्गीकरण करण्यासाठी सुरू केलेल्या प्रक्रियेला मंगळवारी आंदोलनकर्त्यांनी असंवैधानिक ठरवत ती तत्काळ स्थगित करण्याची मागणी केली. जोपर्यंत देशातील जनगणना पूर्ण होत नाही आणि अनुसूचित जातींचा इम्पिरिकल डेटा संकलित होत नाही, तोपर्यंत कोणतीही कार्यवाही करू नये, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

यावेळी न्यायमूर्ती (निवृत्त) अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसताना शासनाने हरकती व सूचना मागवणे ही जनतेची दिशाभूल असल्याचा आरोप करण्यात आला. समितीचा अहवाल तातडीने जाहीर करून त्यानंतरच हरकती नोंदविण्यासाठी किमान ६० दिवसांचा कालावधी देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या २०२४ मधील मार्गदर्शक तत्त्वांचा हवाला देत, उपवर्गीकरणासाठी प्रत्यक्ष पुराव्यावर आधारित आकडेवारी आवश्यक असल्याचे नमूद केले. कोणताही शास्त्रीय डेटा न संकलित करता शासनाने प्रक्रिया राबवणे घटनाबाह्य असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

या आंदोलनात अनुसूचित जातींचे प्रतिनिधी, आंबेडकरी अनुयायी आणि संविधान जागृत नागरिकांनी राहुल एस. एम. प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली धरणे आंदोलन करीत तीव्र निषेध नोंदविला. यावेळी रमेश सोनाळे, सत्यपाल सावंत, स्वप्नील नरबाग, राज गोडबोले, काळबा हनवते, संतोष आगबोटे, पंडित सोनाळे, शुभम सोनाळे, भरत कानिंदे, यशवंत गच्चे, के. एच. वन्ने, अशोक गायकवाड, अंकुश सावते, भीमराव बुक्तरे, मयुर शेरे, सचिन राजभोज, किरण सदावर्ते, अमोल येरेकार यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. धरणे आंदोलनानंतर निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी शासनाने लोकभावनेची दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास २७ एप्रिल रोजी नांदेडमधील सर्व ५९ जाती एकत्रितपणे तीव्र आंदोलन करतील असा इशाराही दिला. या आंदोलनामुळे अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, शासनाची पुढील भूमिका काय राहणार याकडे लक्ष लागले आहे.

# विकासनगर सोसायटीतील २५ टक्के भाग ड्रेनेजपासून वंचित; नागरिकांचा तीव्र संताप

**नांदेड (प्रतिनिधी)-** महापालिकेच्या अमृत २.० योजनेअंतर्गत शहरात ड्रेनेज व रस्त्यांची कामे सुरू असताना विजयनगर, तरोडा (बु.) येथील सर्वे नं. ७० मधील परिसर अभियांत्रिकी सहकारी गृहनिर्माण संस्था तथा विकासनगर सोसायटीतील सुमारे २५ टक्के भागाला अद्यापही ड्रेनेज सुविधेपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याबाबत वारंवार निवेदने देऊनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सोसायटीच्या नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार पूर्वे-कडील सूर्यवंशी यांच्या घरापासून पश्चिमेकडील डॉ. दवणे यांच्या घरापर्यंत तसेच उत्तरेकडील धुतराज यांच्या घरापासून दक्षिणेकडील अंबुलगेकर यांच्या घरापर्यंत, तसेच दुसऱ्या लाईनमध्ये तामटे यांच्या घरापासून कावळे यांच्या घरापर्यंत एकूण २५ घरांमध्ये ड्रेनेज लाईनचे कामच करण्यात आलेले नाही. त्यामुळे घरगुती सांडपाणी सोसायटीत साचत असून, नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या भागात नाल्याचीही सुविधा नसल्याने परिसरात डुकरांचा वावर वाढला असून, डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, भविष्यात हा भाग रोगराईचा केंद्रबिंदू ठरू शकतो, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अमृत २.० योजनेअंतर्गत नांदेड शहरासाठी ड्रेनेज कामांसाठी मोठा निधी मंजूर झाला असतानाही विकासनगरमधील या भागाचे काम मुद्दाम दुर्लक्षित करण्यात आले आहे. सोसायटीने ड्रेनेजसाठी पहिला अर्ज २७ डिसेंबर २०१६ रोजी दिला होता. त्यानंतर अनेक निवेदने, पाठपुरावे, महापौर, नगरसेवक, कार्यकारी अभियंता, आयुक्त तसेच संबंधित ठेकेदार यांच्याकडे वारंवार मागणी करूनही प्रश्न प्रलंबितच आहे.

### पिण्याच्या पाण्याचीही सुविधा नाही

विकासनगरच्या ओपन स्पेसमध्येच महानगरपालिकेची मोठी पाण्याची टाकी असूनसुद्धा याच २५ घरांना अद्याप पिण्याच्या पाण्याची पाइपलाईन टाकण्यात आलेली नाही. नव्याने निवडून आलेले महापौर या नगरात भेट देऊन पाण्याच्या पाईपलाईनचे काम उद्याच सुरू करतो, असे आश्वासन देऊन गेले; मात्र त्याला एक महिना उलटूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यावरून संबंधित भागातील विकासकामांबाबत प्रशासनाची उदासीनता स्पष्टपणे दिसून येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

शुक्रवार, दि. १६ एप्रिल रोजी विकासनगर सोसायटीतील सदस्यांनी महापालिकेचे आयुक्त यांची भेट घेऊन समस्या मांडली. यावेळी महानगरपालिकेचे गटनेते प्रशांत इंगोले तसेच या प्रभागाचे नगरसेवक प्रतिनिधी जोंधळे उपस्थित होते. सद्यस्थितीची पाहणी करण्यासाठी महापौरांनी कार्यकारी अभियंत्यांना विकासनगर येथे जाण्याचे निर्देश दिले. त्यानुसार महापालिकेचे स्वामी, कंत्राटदाराचे अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. मात्र या पाहणीत कोणताही ठोस मार्ग निघालेला नसल्याची माहिती नागरिकांनी दिली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com